THE BRAHMA-SUTRAS OR VEDANTIC SYSTEM OF BÂDARAYANA

We have arranged to enlarge the size of our studies in Indian philosophy by adding eight pages to each monthly part. We have been asked by scholars of eminence to undertake the interpretation and explanation of the sûtras or aphorisms of Bâdarâyana which are the basis of Indian Vedantism or Pantheism. We should have certainly begun our series by preferring Vedantism or the system of Badarâyana to Karma Mimânsâ or the system of Jaimini. But such a procedure would have subverted chronological order, which is the essence of historical sequence. No event or series of events or no philosophical situation is isolated. It has its antecedents from which it results. The system of Badarâyana as well as that of Jaimini is the inevitable consequence of an important historical revolution. The doctrines—which mould the conduct of a modern Hindu, which tinge his political aspirations, which constitute the essence of the religious system he has developed in modern times, and which determine the nature of the social in-
...tions and the principles of the united family system
value o... at present in India—are the result of two
on the Veda... can be characterized from an historical
contrast of th... Vaidika and Buddhistic or more correct
the Indian ... and reactionary
dition of the ...st enter on a short historical sketch to
Vedas of an...aring of the two polities on one another
as pastoral li...

that the doctrines known by the comprehensive na
of Vedantism may be properly interpreted and expla
ed the proper interpretation of a system of philosop
is that which carefully investigates the *situation*, w
its surroundings, with its under-currents, with its lo
which seeks to justify it to its opponents logic to
distinguished from its causes which, though carefu
concealed by the actors on the historical stage from t
masses of the people, necessitate the growth of a p
losophical system by their feelings being moved, a
by their intellect being roused

We will take the Âryan or Vaidika polity fi
The Âryas entered India at least about four thousa
years before the Christian era. They were only a tr
in Ârâna a tribe left behind in the progress of t
united Âryas in civilization They occupied the nor
eastern corner of Ârâna. The country from the val
between the Oxus and the Jaxartes in the north to t
valleys of the seven rivers of the Panjab and Cabul in t
south, and from the plateaus of the Hindu-Kush a
Paropamisan ranges in the east to the valleys of
Euphrates and the Tigris in the west—was occupied
the Âryan tribes About the time, the Âryans mov
en masse towards India, the Âryas in Ârâna w
passing through an important social, religious and
litical revolution It is only now-a-days that a distı
tion can be made between social, religious and
litical movements. But through the oceanic cu
of history, such a distinction cannot be marke
ever a nation is moved, and begins to put fo
new energies, its activities are many-sid -activiti
whether social, religious or political, being mixed
and inseparable from one another This is, howeve
specially true in the case of all ancient nations. Th

Âryan tribes in the country, the boundaries of which we have indicated, had to pass from the pastoral into the agricultural condition of life for every where settled life began to be appreciated agricultural operations were commended directions for the preservation of the agricultural enclosure were specially given the confederacy and the kingdom were religiously respected the idea of a council with a president characterized the highest religious conceptions Ahura mazda (Asura medhasta) was the name of God himself—Asura being the deity of life and the means of its sustenance—the holder of *asu* (life) while two spirits Shpento mainyus and Anra mainyus were opposed to each other The first was the good spirit and the last, the evil spirit—the former meaning white thought (Shveta manyus) and the latter non Âryan thought (Anârya manyus) The council of gods under the presidency of Shpento mainyus was a reflection of a regular political council in the country—a council which represented the power of the confederacy of tribes By way of contradistinction Anra mainyus also had a council of his own Vohumano (Vasu manas) who ruled over the passions appetites affections, desires, and thoughts of man also had a council His opponent Akem mano (Aksema manas) led whatever is evil in every individual man This picture of society is drawn in the Zend avesta, the historical value of which as throwing a great deal of side light on the Vedas of the Indian Âryas is very great The contrast of the Mazdayasnian or the Iranian Aryas with the Indian Âryas illustrates the social and political condition of the latter There is no mention made in the Vedas of any council The confederacy is not alluded to as pastoral life predominated. The wild warriors marched

into India, fell on the aborigines and settled as they pleased It is significantly seen that these wild warriors still betrayed predilections for nomadic life as they seized a wild bison, roasted him alive and despatched his flesh Yet agriculture was pursued by the followers of these warriors, whose ambition was gratified by hunting expeditions These warriors were also bards whose genius was fired by the scenery of the Indian forests, and of the valleys of Indian rivers,and by the stupendous ranges of Indian mountains, and who invoked their gods in new strains instinct with warm poetical feelings. All the hymns of Indra portray the feelings of the war-like Indian Âryas the Mazdayasmians detested Indra, and set him down as a demon, as a member of the council of A*n*ra-mainyus. The bards of the Indian Âryas praised their gods as they invoked them at the time of their sacrificies, the essential feature of which was the representation of the pastoral mode of life milking their cows, tying their calves, bringing a bundle of fuel, ropes made of rush, and a kind of grass for seats from the forest, marking and arranging rude utensils of cooking, preparing the materials of a cake to be baked on potsherds, offering it into fire and eating it, clarified butter being plentifully used The gods came as they were invited. The bard also was a priest, at first there being only one the Brahmâ the increaser the bard of the threshing floor. Yet the ideas of personal sin (Pâpmâ) as opposed to good knowledge (Sanjnâna) the Indian Âryas realized though not so vividly as the Iranian Âryas did. The Indian Âryas, that is, their leaders developed a sort of feudal system which is the distinguishing feature of the Vaidika social, religious and political polity which originated in the settle-

ment of the Âryas in India and in the formation of small kingdoms, each acting for itself, each developing its power, and each ambitiously increasing and economising its resources,—the Vaishyas or the peasantry quietly looking on, and taking a part in a revolution as followers whose opinions and feelings could not be ignored, but who were under the guidance of those who could undertake the onerous and responsible functions of leaders worthy of respect and obedience The warrior chiefs had their courts, their seraglios, their halls of justice, their police, their schools, and *Rita*—their immutable unwritten code of morals—so often mentioned in the *Rig* Veda. The society, consisting of hundreds of chiefs devoted to chivalrous pursuits and cherishing chivalrous aspirations, moved on, cultivating peaceful arts, performing religious ceremonies developing their style of life, bringing new tracts under cultivation, exploring the courses of rivers, and delighting in poetry as recited at their annual assemblages

The warriors are well qualified for leading a community, marching in search of new homes, exposed to frequent dangers, ever involved in warfare, and ever desirous of a permanent settlement

As soon as a permanent settlement is formed, the energies of the leaders slacken their hold on the minds of their followers is weakened, their pride giving offence and their pretensions to superiority awakening jealousy Of such circumstances and of such a popular feeling the priest is not slow to take advantage The chaplain of the feudal mansion gradually usurps power his dictates as religiously binding on society are enthusiastically obeyed The political leadership belongs *de jure* to the king or the duke, but it is exercised by the chaplain who has spiritual power over the wives

and children of the lord of the castle, as the basis of the power of the chaplain of the feudal mansion is theology

Thus when theology was encouraged, and when the priest came to be respected, the Âryas in India had passed through an important revolution. The *Risi*-period had passed away the Brahmavâdi-period came The period of conquest, of expansion, of adventures, and of new hymns had passed way the period of a permanent settlement, of the peaceful enjoyment of luxuries and of the interpretation of the old hymns came. The period of military glory and military prowess had passed away the period of vain glorious demonstration of the past military glory, of the narration of battles and of success already achieved, came This period is depicted with remarkable fidelity in the Vaidika works known as Brâhma*n*a-literature, the essential feature of which is the celebration of a sacrifice which flattered the vanity of a rich householder, which presented to his mind a picture of military glory, and of social importance, and which led him to believe that he had propitiated his gods, but which really increased the power of the priest and established his prestige This state of things, however, could not last long A reaction came in time a reaction that threatened the over-throw of the Vaidika-polity Two classes of society the conformists or Vaidikâchâryas and dissenters or Bouddâchâryas began a conflict fraught with remarkable consequences to mankind We will briefly sketch their bearings on one another

These two sections grew out of the Âryas and the aborigines of India, being thrown together for centuries Intermarriages, though condemned by Âryan legislators, took place between the two sections. Class-

es resembling the American mulattos, quadroons, and octoroons, came into existence These classes naturally sought to be admitted to the privileges of the genuine Âryas who, in their turn, resented and attempted to suppress their pretensions The story of Kavasa Ailusa is an illustration in point The two sections of the Âryan society pulled on together, though their interests often jarred Learned and influential genuine Âryas often espoused the cause of the Âryanized aborigines until at last the forces that created the opposition between the two classes were organized. Suppressed and ignored, the Âryanized aborigines, known as the crowd or multitude(Sangha), dissented from the genuine Âryas, known as the upper classes (Udgha) Similar causes have produced similar phenomena in modern India We have the genuine Pathan whose superior physique and hauteur distinguish him from the spurious Pathân of mixed blood who aspires to be considered a genuine Pathan, and disdains the familiar approaches of the mass of the Indian Mohammedans

We have called the Âryanized aborigines dissenters and non conformists, because their tenets differed essentially from those of the genuine Âryas The one believed in the stability and permanence of the world the other looked upon the world as a mere illusion The one believed in the existence of Heaven, its happiness, and its attainment the other believed that its three fold misery--spiritual, physical, and that caused by gods recurred perpetually, their souls transmigrating from body to body to endure new pains The one believed in the efficacy of sacrifices and considered it their exclusive privilege to perform them as the direct means of all worldly pleasures, nay of Heaven

itself: the other believed the sacrifices to be the means of evil. The one sought children, cattle and wealth: the other prefered austerities, and willingly enduring them, delighted in the name of Shramana or labourer. The one gloried in the acquisition of knowledge as the means of worldly happiness and insisted upon the Vedas being the revelation from God. the other prefered contemplation and retirement into a convent. The one valued active life (Karma) and inculcated it systematically upon the students in its schools. the other traced all its miseries to the power of its activites (Karma and Upâdâna) The one worshipped elemental gods, such as Indra, Vâyu, and Agni the other worshipped the relics of their leaders and thus paved the way for modern idolatry. The one boasted of its prestige and privileges and considered caste to be the essential element of their social polity. the other, taking a higher position, prefered truth and righteousness to caste The women of the one delighted in worldly glory and participated with their husbands in the performance of sacrifices: the women of the other became nuns and abandoned the pleasures of the world To the one their gods, nature, and spirit, appeared to be the source of cheerfulness and pleasure to the other, gods nature, and spirit, appeared malevolent powers The one could understand and realize only class-interests: the other openly preached universal benevolence. The one killed every day lower animals for food as well as for sacrifices: the other gloried in Ahinsâ or total abstinence from the use of flesh. The one considered it its privilege to lord it over the whole world the other believed that man and lower animals were equally entitled to the use of what the earth produced The one boasted of its intellectuality. the other delighted in faith. The one

aspired after the pleasures of this world or the world to come the other aspired after Nirvana or the utter annihilation of the individual existence of man Thus the tenets of the conformists or the genuine Âryan society contrasted in every respect with those of the non conformists or Âryanized aborigines The former constituted the Vaidika polity the latter, the Buddhistic polity Both these polities exercise a great influence on the modern Hindu society

The Vaidika polity is explained and defended in the Purva Mimânsa or the system of Jaimini Bâdarâyana in the Uttara Mimansâ or Brahma sûtra systematizes the Buddhistic polity and explains its bearings The system of Jaimini still exercises its influence by means of the precepts of the Puranas, which inculcate a variety of religious rites or Vratas still devoutly performed by every Hindu The system of Bâdarâyana supplies the intellectual want of the whole of India It is interpreted in different ways Shankarâchârya's interpretation however, approaches the Buddhistic stand point more than the interpretations of Madhvacharya or Ramanuja The system of Shankarâchârya, however, is eclectic so far as it permits the slaughter of animals for sacrificial purposes, and thus commends the Vaidika polity The interpretation of Madhvâchârya accepts the Vaidika polity, but rejects it so far as the slaughter of animals for sacrificial purposes is concerned, and thus commends the Buddhistic doctrine of Ahinsâ Râmanuja occupies a position between the Vaidika and the Buddhistic polities The interpretation of Vallabha is a necessary growth. We have procured copies of Shankaracharya's, Madhvâchârya's Ramanuja's, and Vallabha's interpretations and will place them side by side and offer our

interpretation when necessary to the reader. Every philosophical system is conversant with the discussion of a variety of problems arising from the five-fold conception of man his conception of the phenomenal existences in relation to himself, his conception of their genesis in relation to the first cause, his conception of the relation between the one and the other, his conception of powers within himself and powers without him, and of their reciprocal relation, and his conception of supreme happiness or of emancipation or of salvation. The point of view of the Karma-Mîmânsâ is entirely different from that of Brahma-Mîmânsâ What causes produced the difference of the points of view, we have attempted to show. The variety of problems arising from the five-fold conception of man are discussed in the body of the philosophical systems, and we indicate the particular sûtras in the short summaries we offer to our readers Before we conclude, we must add that the examination of the Pûrva-Mîmânsâ and the Uttara-Mîmânsâ will elucidate the Vaidika and the Buddhistic polities, the historical importance of which can not be exaggerated.

प्रस्तावना.

ब्रह्मसूत्र म्हणजे बादरायणकृत वेदांतदर्शन

प्रत्येक अकांत आठ पृष्ठें अधिक घालून आमची षड्दर्शन-चिंतनिका वाढवावी असा आमचा बेत आहे वेदांतशास्त्राचें मुख्य बीज म्हणजे बादरायणकृत ब्रह्मसूत्रें यांच्या अर्थाची फाड करून विवेचन करावें असें काहीं पक्षपात पंडितांनीं आम्हास सुचविलें आणि आम्हींहि ज्ञानमीमांसेचें विवेचन प्रथम सुरू केलें असतें पण असें केलें असता कालक्रम बिघडतो असें आम्हास वाटतें कारण इतिहासाचें रहस्य कालक्रम आहे हें स्पष्ट आहे कीं, ऐतिहासिक मोठमोठ्या गोष्टी किंवा स्थितिसंधान तुटक तुटक कधींहि नसतें त्यांचा परस्परांशीं नित्य संबंध आहे अर्वाचीन गोष्टी आणि प्राचीन गोष्टी यांचा परस्पर कार्यकारणसंबंध आहे बादरायणकृत दर्शन आणि जैमिनिकृत दर्शन हीं दोन्हींहि ऐतिहासिक मोठ्या मन्वंतराचे परिणाम आहेत ज्या मतापासून आम्हा अर्वाचीन हिंदूंचें अमुकच आचरण असावें असें निष्पन्न होतें, ज्या मतांवरून आमचे मोठमोठे कारस्थानी उद्देश अमुकच असा रंग दिसतो, ज्या मतापासून आम्हा अर्वाचीन हिंदूंच्या धर्मसिद्धांताचीं तत्वें निघतात आणि अलीकडील हिंदुस्थानातील संसृष्टि किंवा सामाजिक आचार यांचें अमुकच स्वरूप असावें असें सिद्ध होतें, अशीं जीं मतें तीं आलीं तरी कोठून? हीं सर्व मतें दोन सिद्धांतापासून उत्पन्न झालीं आहेत इतिहासदृष्ट्या या दोन सिद्धांताचीं नावें वैदिकपरंपरा आणि बौद्धपरंपरा किंवा आर्यपरंपरा आणि अनार्यपरंपरा अशीं ठेवावीं असें आम्हास वाटतें

बहुसंवादक वेदांतदर्शनाचा अर्थ नीट रीतीनें व्हावा व विवेचन व्हावें म्हणून वैदिक आणि बौद्ध परंपरांचा परस्पर संबंध काय हें दाखविलें पाहिजे आणि हें दाखविण्याकरता इतिहासाचा थोडा विचार केला

पाहिजे. कोणत्याहि शास्त्रीय सिद्धांताचा नीट अर्थ करणे म्हणजे काय? मोठ्या काळजीने शास्त्रीय स्थितिसंधानाचा शोध केला पाहिजे, त्याच्या आजूबाजूस काय आहे ते पाहिले पाहिजे, आणि त्याच्या पोटामध्ये कोणकोणच्या प्रकारचे पीळ आहेत हेहि पाहिले पाहिजे. पंडितांनी आपल्या शास्त्रीय सिद्धांताचे मंडन करण्याकरतां प्रतिपक्षापुढे कोणकोणते विषय मांडले हेही दाखविले पाहिजे पंडितांनी प्रतिपक्षाचे खंडन करतांना जे जे उपाय योजले ते ते उपाय त्या शास्त्रीय स्थितिसंधानाचे कारण नव्हे. शास्त्रीय स्थितिसंधान उत्पन्न होण्याची कारणे भिन्न आहेत. ती कारणे वादविवाद करणारे लोक जनसमाजाच्या दृष्टीस पडू देत नाहींत. तथापि जनसमाजाच्या बुद्धीमध्ये स्फुरण होऊन त्याच्या मनोवृत्तीला चेतना होऊन त्यापासूनच शास्त्रीय स्थितिसंधान उत्पन्न होते ही गोष्ट समजण्याजोगी आहे. या गोष्टीची फोड पुढील विचारावरून होईल.

प्रथम आर्य किंवा वैदिक व्यवस्थेविषयीं विचार करायाचा. ख्रिस्ती शकाच्या पूर्वी चार हजार वर्षांच्या सुमारास आर्य लोक हिंदुस्थानात शिरले. सर्व आर्य लोकाच्या स्थितीकडे पाहिले असता दुसऱ्या आर्यलोकाइतके हिंदुस्थानात येणारे आर्य सुधारले नव्हते. मूळ आर्यदेशात रहाणारे लोक आपल्या देशास आर्यदेश असे म्हणत. हिंदुस्थानांत येणारे आर्यलोक या देशाचे ईशान्य कोपऱ्यात रहात असत. त्या देशाची चतुःसीमा येणेप्रमाणे' उत्तर दिशेस वक्ष आणि यक्षावर्त या नद्यांमधील प्रदेश. दक्षिण दिशेस काबूल आणि पंजाब या देशांतल्या नद्यामधील प्रदेश. पूर्वेकडे हिंदुकुशांचीं पाठारे. आणि पश्चिमेकडे सुभ्राता आणि शोधी या नद्या. सहकुटुंब सहपरिवार जेव्हा आर्यलोक हिंदुस्थानात शिरले, तेव्हा आर्यदेशातील आर्यलोकामध्ये मोठी सामाजिक, धार्मिक आणि राजकीय उलटापालट होऊन मन्वंतर फिरत होते. सामाजिक, धार्मिक, आणि राजकीय गोष्टी भिन्न आहेत, असें आतां मात्र म्हणतां येतें. परंतु इतिहासाचा ओघ सागराच्या ओघासारखाच आहे. त्यांमध्ये अमु-

क राजकीय, अमुक धार्मिक आणि अमुक सामाजिक असा भेद करतां येत नाही. जेव्हां जेव्हां एखाद्या देशांत हालचाल होऊं लागते, आणि लोकांमध्ये बुद्धीचे आणि शक्तीचे नवे नवे तरंग उठूं लागतात, तेव्हां तेव्हां त्या लोकांमध्ये नाना प्रकारची गडबड चालते. अशा प्रसंगीं त्या गडबडीची विल्हेवारी करतां येत नाही. निराळी सामाजिक गडबड इतकी, धार्मिक गडबड इतकी, आणि राजकीय गडबड इतकी असें म्हणतां येत नाही. सामाजिक व्यवस्था करूं इच्छिणाऱ्या लोकांच्या पोटांत धार्मिक किंवा राजकीय गडबडीचें जमाखर्च फुटत असतात म्हणून अशा प्रकारचे सारे उद्योग एकमेकांत गुंतले असल्यामुळें त्यांचा भेद करतां येत नाही. प्राचीन काळीं जे जे लोक होऊन गेले, त्या सर्वांस हा सिद्धांत विशेष लागू पडतो. ज्या देशाच्या चतुःसीमेचें आम्हीं पूर्वी वर्णन केलें आहे, त्या देशांतील लोक पूर्वी केवळ गोपाळ होते. त्यां च्यापाशीं गुरेंढोरें पुष्कळ असत. त्यांना रानाकुरणांत चारीत फिरवून ते लोक दुधदुभत्यावर आपला निर्वाह करीत. त्यांना शेतकी म्हणजे काय हें ठाऊक नसे. ही स्थिति जाऊन ते आतां हळू हळू शेतकी करूं लागले. जेथें धनगरी तऱ्हा असते, तेथें शेतकी नसते. शेतकी समजू लागली म्हणजे हळू हळू धनगरी तऱ्हा नाहींशी होते. या कुरणांतून त्या कुरणांत गुरें चारीत फिरण्यापेक्षां या आर्य लोकांस एके ठिकाणीं शेतकी करीत रहाणें बरें वाटूं लागलें व शेतकीसंबंधीं निरनिराळे धंदे बरे असें ते म्हणूं लागले. कुरणांमधील शेतांचें योग्य रक्षण व्हावें म्हणून शास्त्राचें नियम निघूं लागले. जमीन आणि राज्य याविषयीं पूज्य बुद्धि उत्पन्न होऊन धार्मिक भाव वाटूं लागला. या वेळचे अति उत्तम धार्मिक विचार कोणते? तर परिषद् असावें आणि त्या वरती अध्यक्ष असावा असें त्यांस वाटत असे. पार्शी लोकांमध्यें अहुरमझ्द् हें ईश्वराचें नांव आहे. संस्कृतांतील अहूर मझ्द् याचें असुर मेधिष्ट हें रूप, असुर म्हणजे जीवनाची देवता—जीवन रक्षण करण्याचें साधन, आणि असु म्हणजे

जीवन. असु धारण करते ती असुरदेवता. झंद्-अवस्था पुस्तकांत दोन प्रकारच्या जीवांचे वर्णन केले आहे एकाचे नाव स्पेंतोमैन्युः, आणि दुसऱ्याचे नांव अंग्रमैन्युः. या दोन जीवांचे परस्पर वैमनस्य आहे. स्पेंतोमैन्युः म्हणजे श्वेतमन्युः (शुभ्र विचार). ही सुबुद्धि उत्पन्न करणारी शक्ति आहे. अंग्रमैन्युः म्हणजे अनार्यमन्यु (अनार्य विचार). ही कुबुद्धीची देवता आहे. देशामध्ये जे राजकीय परिषद् असे, त्या परिषदाचेच प्रतिबिंब असे एक देवतांचे परिषद् आहे असे पार्शी लोक मानीत. आणि त्या परिषदाच्या अध्यक्षस्थानीं स्पेंतोमैन्युः आहे, असे ते समजत. देशांतील राजकीय परिषद् म्हणजे काय? सर्व जातीच्या जमातीचा अधिकार चालवणारी एक सभा असे. स्पेंतोमैन्युः अध्यक्षस्थानीं असून जसे सुबुद्धीचे परिषद् तसेच कुबुद्धिनायक अंग्रमैन्युः ज्यांत अध्यक्ष आहे असे दुसरे परिषद् आहे असे प्राचीन पार्शी लोक मानीत. ही देवलोकाची व्यवस्था झाली. आतां मनुष्य लोकीं प्रत्येक प्राण्यामध्यें दोन प्रकारची शक्ति आहे. एकीचे नांव वोहुमनो (वसुमनः), आणि दुसरीचे नांव अकेममनो (अक्षेममनः) अशीं नावे ठेवलीं असत. वोहुमनो अध्यक्षस्थानीं असून मनुष्याच्या मनांत याचे परिषद् आहे. त्याचा अधिकार मनुष्याच्या विचारावर, प्रीतीवर, इच्छांवर, कलांवर, अनुरागावर चालतो. अकेममनो या शक्तीच्या अधिकाराखालीं मनुष्याची दुर्बुद्धि व दुर्गुण आहेत. पार्शी लोकांच्या धर्मपुस्तकामध्ये अशा प्रकारे लोकसमूहाचे वर्णन केले आहे. या पार्शी लोकांच्या धर्मपुस्तकापासून हिंदुस्थानातील आर्य लोकांच्या वेदातील पुष्कळ गोष्टींची फोड होते, म्हणून पार्शी लोकांच्या धर्मपुस्तकाची योग्यता इतिहासदृष्ट्या मोठी आहे. मझ्दयष्णी किंवा इराणी आर्य यांची आणि भारतखंडीय आर्य यांची तुळणा केली असतां वैदिक धर्म आचरणाऱ्या आर्य लोकांची राजकीय आणि सामाजिक स्थिति कशी होती हे कळून येते. ऋग्वेदामध्ये कोठेहि परिषदाचे नांव नाहीं. लोकसंस्था म्हटली म्हणजे जिकडे तिकडे

गोपालांच्या तऱ्हेची होती आणि हात लोकांमध्येंना मुख्य प्रचार असे म्हणजे शेतकीच्या या जमातींत प्रचार पडला नव्हता स्वेच्छाचारी योद्धे हिंदुस्थानांत चाल करून आले त्यांनी एतद्देशीय मूळ रहिवाशी लोकांवर हल्ला केला, आणि मग मोठमोठे पाटील त्याप्रमाणे हिंदुस्थानांत मराठी केल्या राज्यामध्ये मदत असतां ज्या ज्या गोष्टींची त्यांना गरज लागली होती, त्या त्या गोष्टींची आवड असून त्यांना आठवण होत असे उदाहरणार्थ ते गो पाळीत, त्यांना मानीत, आणि त्यांचें मांस भक्षण करीत तथापि असे असताहि जरी योद्धे शिकारीच्या कामांत गुंतले असत, आणि शिकार करण्यांत मोठें महत्व मानीत असत, तरी त्यांचे अनुयायी लोक शेतकीचा धंदा करीत हे योद्धे मोठे शूर असत हिंदुस्थानांतील अरण्यें किंवा मोठमोठ्या नद्यांचीं पात्रें किंवा बुद्धि गुंग करणारी पर्वतांची ओळ ही पाहिली म्हणजे यांच्या स्वभावाच्या योगानें त्यांच्या बुद्धीत स्फुरण चढत असे आणि त्यांमध्यें अन्तःकरणास सन्तोषित करणारा रस आहे अशीं नवीं नवीं काव्यें करून ते आपल्या देवतांचीं आवाहनें करीत असत हिंदुस्थानांतील युद्धधुरंधर आर्यांच्या मनोवृत्ति कशा होत्या, हें ऋग्वेदां तील इंद्रसूक्तें पाहिल्यानें समजतें इराणांतील मझ्दयस्नी आर्य इंद्राची निंदा करीत, आणि इंद्र पिशाच आहे असें ते समजत फुरुद्दीनायक अहुरमेझ्दाच्या सभेंतील एक सभासद इंद्र आहे असें ते समजत हिं दुस्थानांतील आर्य लोकांनी कवि यज्ञप्रसंगीं इंद्राची स्तुति करीत आणि त्याचें आवाहन करीत यज्ञ म्हणजे काय? त्यांतील मुख्य तत्त्व इत केंच आहे कीं, गोपालांच्या तऱ्हेची जी जनसंस्था असते, तिचा उत्सव करावयाचा म्हणजे गाईंची धार काढावयाची, त्यांच्या वासरांना एकीकडे बांधावयाचें, रानांत जाऊन समिधांची मोळी आणावयाची, कुशाचे दोर आणावयाचे, आसनाकरतां दर्भ आणावयाचे, स्वयंपाकाचीं आवडधोवड पात्रें ठाकून ठोकून नीट मांडावयाचीं, पुरोडाशाचें सामान तयार करा

याचे, विटकराच्या तुकड्यांच्या केलेल्या कपालांवर तो भाजायाचा, मग अंशतः तो अग्नीस अर्पण करायाचा. सर्व यज्ञभर जिकडे तिकडे तुपाचा उपयोग फार. ज्या रीतीने देवाला आमंत्रण करीत त्या रीतीने देवहि येत असत. जो कवि तोच ऋत्विज् आणि ऋत्विज् तोच कवि, अशी व्यवस्था असे. आणि पूर्वी यज्ञामध्ये एकच ऋत्विज् असे. त्याचे नाव ब्रह्मा. ब्रह्मा म्हणजे वर्धन करणारा, म्हणजे स्तव्यावरती गाणारा कवि. संज्ञान म्हणजे काय, आणि ते पुरुषरूपी पापाच्या विरुद्ध कसे आहे हे विचार वैदिक आर्यांस पूर्ण माहित होते खरे. तथापि इराणी आर्यां इतके ते त्यांच्या पुढे ढळढळीत वागत नसत. हिंदुस्थानांतले आर्य म्हणजे त्याचे पुढारी याच्या मध्ये मांडलिक राजमंडलसंस्था उत्पन्न झाली, आणि वेदाच्या वेळच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय व्यवस्थाचे तेथून मूळ निघाले. ही संस्था कशी उत्पन्न झाली असे विचारले तर हिंदुस्थानात जेव्हा आर्यलोक आले आणि त्यानीं वसाहती केल्या तेव्हां प्रत्येक प्रत्येक योध्याने आपापले राज्य साधून घेतले. आपल्याच उत्कर्षाकरतां तो झटूं लागला. आपल्याच त्याणे अधिकार वाढविला. आणि जितकी आपली ताकद तितकी आपली योग्यता वाढावी म्हणून प्रत्येक वीरपुरुष युद्धास प्रवृत्त झाला. वैश्य किंवा रयत लोक हे स्वस्थ राहिले आणि काय होते ते पाहूं लागले. राज्यक्रांति होऊं लागली म्हणजे त्याचे म्हणणे काय, व त्यांच्या मनात काय आहे याचा विचार सहज होत असे. आणि जरी त्यांच्या म्हणण्याचा विचार होत असे, तरी ते राजे लोकांचे अनुयायी इतकीच त्याची योग्यता असे. आणि हे ठीकच आहे. ज्या वीर लोकाची योग्यता मोठी त्यांच्यावर पुढारीपणाची जबाबदारी पडे. त्यांच्यावर पुढारीपणाचे ओझे पडे, म्हणून वीर लोकांच्या संधानानेच हे लोक वागत. व जसे वीर लोक सागत तसे वैश्य लोक करीत. या क्षत्रिय वीरांचीं दरबारे असत, त्यांचे जनानखाने असत, त्यांचीं न्यायाधिकरणे असत, चोरीचपाटीची चौकशी करण्याकरिता

शिपाइ असत, त्यांच्या राज्यांत शाळा असत, व त्या नियमाप्रमाणें त्यांचा व्यवहार चाले त्याचें नांव ऋत असें हे नियम सिद्धिलेले नसत, तथापि ते नित्य आहेत असें ते समजत ऋग्वेदामध्यें या ऋताचें वारंवार वर्णन केलेलें आहे देशांत असे क्षत्रिय राजे शेंकडो असत आपण मोठे योद्धे अशी जेणेंकरून प्रख्याति होइल तें त्याचें मुख्य काम. त्यांनीं शिकारी करावयाच्या व रूपानें श्रीमान् स्त्रिया आपल्या शौर्यानें स्वयंवराच्या वेळीं साध्य कराव्या असा त्यांचा उद्योग असे आणि दिवसभर अशा कामीं त्यांचें मन गुंतलें असे अशा प्रकारें आर्यजनसमूहाचा ओघ चालला होता कलाकौशल्य प्रगल्भ दशेस आणण्याकरतां ते झटत असत, धर्मकार्यें करीत असत, प्रपंचाची व्यवस्था सुधारीत असत, नव्या नव्या देशामध्यें शिरून त्या देशांत लागवड करीत असत, नदीचा प्रवाह कोणीकडे जातो आहे याचा शोध लावीत, आणि सार्वजनिक सामाजिक यज्ञ होत असतां कांहीं एका ठिकाणीं जमून कीं गाणीं गात तीं गाणीं ऐकून त्यांस मोठा आल्हाद वाटत असे

यथाप्रवृत्तिकरतां नवे नवे देशांचे शोध लागत आहेत, नेहेमी नेहेमी नवीं संकटें प्राप्त होत आहेत, नेहमी युद्धप्रसंग चालला आहे, परंतु कोठें तरी देश सांपडला आणि त्यांत स्वस्थ राहतां यावें असा प्रसंगाचा धाग आहे अशा प्रसंगीं योद्धे लोकांकडे सहजच पुढारीपणा येतो, आणि ते जसें सांगतात तसें सहजच सर्व लोक ऐकतात असा क्षत्रियांचें वर्चस्व असतें

पण एकदा यथावृत्त होऊन जिकडे तिकडे स्वस्थता झालीना झाली कीं, क्षत्रिय लोकांचा अमल ढिला पडतो, त्यांचें वजन कमी पडतें, व आपल्या अनुयायांवर त्यांचा पगडा बरोबर बसत नाहीं कारण स्वस्थतेच्या वेळीं आपल्या वर्चस्वाचा जो डौल क्षत्रिय लोक घालतात, तेणें करून दुसरे लोकांस वाइट वाटतें, व क्षत्रिय लोकच कोण मोठे येवढा डौल मिळवणार असें त्यास वाटून त्यांचा हेवा होऊं लागतो अशी

क्षत्रियांची स्थिति झाली आणि लोकांस वाईट वाटूं लागले म्हणजे धर्म-प्रवर्तक लोकांस संधि फावली. ब्राम्हण पुढे सरसावले. शौर्याची गरज नाही म्हणून क्षत्रिय मागे पडले, हळूं हळूं सारी सत्ता राजोपाध्यायाच्या स्वाधीन झाली, लोक उपाध्यायाच्या नादीं लागले, व उपाध्येबोवा धर्म असा आहे आणि धर्म तसा आहे म्हणून जे लोकांस सांगूं लागतात त्याचाच पगडा लोकांच्या मनावर बसतो आणि तेच चांगले असे लोकांस वाटूं लागते. बाह्यदृष्ट्या सर्व सत्ता राजाच्या स्वाधीन खरी; परंतु अंततः सारी सत्ता उपाध्यायाच्या स्वाधीन होऊन जाते. कारण राजाच्या स्त्रिया आणि मुले यांना उपाध्येबोवांच्या म्हणण्याप्रमाणे चालावे लागते. कारण नित्यकर्माची व धर्माची गुरुकिल्ली उपाध्येबोवाच्या स्वाधीन असते आणि अशा स्थितीमध्ये धर्माचेच प्राबल्य फार असते.

याप्रमाणे जेव्हां धर्माचे प्राबल्य झाले आणि त्या प्राबल्यास लोक अनुसरूं लागले, आणि जेव्हा धर्मप्रवर्तकांची देशामध्ये प्रतिष्ठा वाढली, तेव्हां भरतखंडांतील आर्यलोकांमध्ये मोठे स्थित्यंतर होऊन चुकले होते. ऋषिजनांचा काल गेला होता, ब्रह्मवादिजनांचा काल आला होता. ज्या कालीं आर्य लोकांनीं दुसऱ्यांचा पराजय केला, आपले सामर्थ्य वाढविले, व मोठमोठे पराक्रम केले आणि नवीं नवी सूक्तें गाइली तो काल पार निघून गेला होता. आर्य लोक स्वस्थ स्थाइक वसाहती करून राहिले होते. देशामध्ये जिकडे तिकडे स्वस्थता आणि शांति आहे, ऐष आरामीचा उपभोग होत आहे, नवीं सूक्तें करण्याबद्दल जुन्याच सूक्ताचा अर्थ करण्यांत पंडितजन गुंतले आहेत. ज्या वेळीं मोठे शौर्य आणि युद्धपराक्रम होत होते तो वेळ निघून गेला, आम्ही पूर्वीं असे असे पराक्रम केले, असे असे संग्रामप्रसंग गुजरले, असे असे यश मिळविले, अशा कथा सांगून व्यर्थ डौल मिरविण्याचा काळ आला. या काळाचे उत्तम वर्णन ब्राह्मणनामक वैदिक ग्रंथांत केले आहे. या ब्राह्मणग्रंथाचे मुख्य स्वरूप ते काय आहे ? श्रीमंत यजमानाला नादीं लावून त्याला व्यर्थ

फुगावें, त्याच्या मनात पूर्वीच्या युद्धपराक्रमाचें यश केवढें हें भरवून द्यावें, आपली लोकांत मोठी प्रतिष्ठा आहे असें त्यांस वाटवावें, आपल्या वर देवाची कृपा झाली आहे असें त्यांस भासू लागावें, आणि यजमानाच्या मनाची अशी स्थिति होत असतां धर्मप्रवर्तकाची सत्ता वाढावी असें यज्ञधर्ममार्गाचें स्वरूप आहे तथापि ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं लोकांच्या बुद्धीचा प्रवाह फिरला, आणि त्या प्रवाहाच्या लोंढ्यांत वैदिक व्यवस्था वाहून जाते कीं काय असें वाटू लागलें वैदिक परंपरेस अनुसरणारे लोक म्हणजे वैदिकाचार्य आणि त्याच्या उलट वाद करणारे बौद्धाचार्य, अशा दोन प्रकारच्या आचार्यांमध्यें वादविवाद होऊं लागले, आणि वैमनस्य उत्पन्न झालें या वादापासून व वैमनस्यापासून जे परिणाम घडून आले, ते जगतांतील सर्व लोकांस लागू पडतात वैदिकाचार्य आणि बौद्धाचार्य असे दोन तट झाले, हे एकमेकांशीं कसे वागले याचें आम्हीं संक्षेपत वर्णन करतों

ह्या दोन्ही तटाचे लोक आले कोठून? ह्या दोन्ही तटाचे लोक बाहेरून आलेले विजयी आर्य आणि या देशांतील मूळचे लोक यांच्यांतून उत्पन्न झाले हे दोन तट उत्पन्न होण्याचें कारण असें आहे कीं, हिंदुस्थान देशांत आर्य लोकांचा आणि अनार्य लोकांचा शेंकडों वर्षे समागम झाला जरी आर्यधर्मप्रवर्तकांनीं परस्परामध्यें लग्नें होऊं नयेत असा वारंवार नियम केला, तरी आर्यांचे आणि अनार्यांचे शरीर संबंध झालेच झाले अमेरिकेमध्यें जशा पहिल्या पाहिरीच्या, चवथ्या पाहिरीच्या व आठव्या पाहिरीच्या मिश्र जाति उत्पन्न झाल्या, तशाच मिश्र जाति प्राचीन भरतखंडांत उत्पन्न झाल्या होत्या या मिश्र जातीच्या लोकांच्या मनांत असें सहजच येऊं लागलें कीं, आपले शुद्ध आर्यांच्या इतके अधिकार असावेत, शुद्ध आर्यांमध्यें आपण मोडावें शुद्ध आर्यलोक या मिश्र जातींच्या तिटकारा करूं लागले, आणि त्यांचें म्हणणें मोडून काढून त्यास दाबून टाकण्यास प्रवृत्त झाले दृष्टांतार्थ

रितां कवष ऐलूषाची कथा पहावी. जरी या दोन तटांच्या लोकांचे तंटे होत होते तरी कसे बसे ते एके ठिकाणी राहिले. ज्यांची विद्वत्ता मोठी व अधिकार मोठा असे शुद्ध आर्यलोक केव्हां केव्हां आर्याप्रमाणे वागणाऱ्या अनार्यांचा पक्ष स्वीकारीत. असे होतां होतां दोन्ही तट आवेशास चढले आणि एकमेकांचा पाडाव करण्यास प्रवृत्त झाले. आर्याप्रमाणे वागणारे मिश्र जातीचे लोकांची वारवार हानि होई, त्यांना कोणीच पुसत नसत, आणि काय ती प्रतिष्ठा शुद्ध आर्यांचीच, असें झाल्याने दोन्ही तटाचे वैमनस्य पेटले. शुद्ध आर्य आपणांस उर्ध्व किंवा वरच्या प्रतीचे लोक असे म्हणवीत, आणि मिश्र जातीच्या व आर्याप्रमाणे वागणारास संघ किंवा खालच्या प्रतीचे लोक असे म्हणत. अशा प्रकारची जातिव्यवस्था अलीकडेहि हिंदुस्थानांत उत्पन्न झाली आहे, आणि तिची कारणेहि अशीच आहेत. मुसलमान लोकांत अस्सल पठाण म्हणून लोक आहेत. आपणास उगीच पठाण म्हणवणाऱ्या मिश्र जातीच्या पठाणांपेक्षा त्यांचा शरीराचा बांधा बळकट आणि कुर्रा मोठा. आपण कसे तरी करून अस्सल पठाणात मोडावे अशी मिश्र जातीच्या पठाणाच्या मनाची धाव असते, आणि तो हिंदुस्थानांत जे पुष्कळ मुसलमान आहेत त्यांच्या बरोबर सलगीने वागत नाही. अस्तु.

मिश्र जातीचे आर्य व आर्याप्रमाणे वागणारे अनार्य यांचा एक तट आणि शुद्ध आर्यांचा दुसरा तट असे दोन तट पडले. या दोन्ही तटांच्या मतांमध्ये मोठा भेद असे. शुद्ध आर्य असे मानीत की जग सत्य आहे आणि ते स्थाइक आहे; अशुद्ध आर्य असे मानित की, जग मायारूपी आहे. शुद्ध आर्य असे म्हणत कीं, स्वर्ग आहे, त्यातील सौख्य आहे, व ते मनुष्यास प्राप्त होते; अशुद्ध आर्य असे म्हणत की, जगतामध्ये तापत्रय आहे. ते तापत्रय तीन प्रकारचे आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक. हे तापत्रय हात धुवून मनुष्याच्या पाठीस लागले आहे, आणि नवीं नवी दुःखे भोगण्याकरितां पुनर्जन्म होतो. शुद्ध आर्य असे मानीत कीं, यज्ञापासून फल उत्पन्न होतेच होते, यज्ञ हे ऐहिक सुखाचे साधन आहे; इतकेच काय? पण यज्ञाचे योगाने स्वर्गहि प्राप्त होतो, आणि हा यज्ञ करण्याचा अधिकार आम्हांसच आहे, आणि अशुद्ध आर्य असे मानीत कीं, यज्ञापासून दुःख उत्पन्न होते. शुद्ध आर्य आपणांस पशु प्राप्त व्हावे,

धन प्राप्त व्हावे म्हणून झटत, अशुद्ध आर्य लोकास वैराग्य बरे वाटे आणि ते स्वेच्छेने क्लेश भोगीत, आणि आपणास श्रमण किंवा श्रम कर णारे म्हणण्यात संतोष मानीत ऐहिक सुखाचे साधन ज्ञान आहे असें समजून तें प्राप्त करून घेण्यात शुद्ध आर्य भूषण मानीत आणि ते असा हट्ट धरून बसत कीं वेद हे ईश्वरप्रणीत आहेत, अशुद्ध आर्य लोकास ध्यान करणें बरें वाटे, आणि ते सन्यास घेऊन मठात वास करीत शुद्ध आर्यांचा कर्ममार्गावर किंवा प्रवृत्तिमार्गावर भर असे, 'आणि ते आपल्या विद्यार्थ्यांस तो जपून व्यवस्थित रीतीने शिकवीत, अशुद्ध आर्य लोक प्रवृत्तीपासून सर्व दु खें उत्पन्न होतात असे मानीत इंद्र, वायु आणि अग्नि अशा तात्विक देवताची शुद्ध आर्य लोक पूजा करीत, अशुद्ध आर्य आपल्या मतप्रवर्तकाच्या काहीं शेषाची पूजा करीत (शेष म्हणजे नख, दात, केंश इत्यादि) यापासून प्राचीन मूर्तिपूजेची प्रवृत्ति झाली शुद्ध आर्यलोक आपल्या वर्चस्वाची प्रतिष्ठा मानीत, आपले अधिकार मोठे असें मानीत, आणि सामाजिक व्यवस्थेचें मुख्य तत्व जातिभेद आहे असें मानीत, अशुद्ध आर्य यापेक्षा उत्तम व्यवस्था करून जातींपेक्षा सत्य आणि धर्म याची योग्यता मोठी असें मानीत शुद्ध आर्यांच्या स्त्रिया ऐहिक भूषणे मिळाल्याने संतोष मानीत, आणि आपल्या पतिसहवर्तमान यज्ञ करण्यामध्ये विराजमान होत, अशुद्ध आ र्यांच्या स्त्रिया वैरागिणी होत आणि ऐहिक सुखाचा त्याग करीत शुद्ध आर्यांस सृष्टि, देव आणि आत्मा हे आनदाचें आणि सुखाचे आगर आहे असें वाटे, अशुद्ध आर्यांस सृष्टि, देव, आणि आत्मा ह्या कोणी दु ख कारक शक्ति आहेत असें वाटे शुद्ध आर्यांस जात्याभिमान फार असे आणि फक्त स्वजातीचे हिताहित त्यास समजत असे, अशुद्ध आर्य स्पष्ट रीतीने असें म्हणत कीं सर्वभूतीं दया करावी आणि प्रीति करावी हा धर्म आहे शुद्ध आर्य नित्यशः यज्ञाकरिता आणि भक्षाकरिता पशु मारीत, अशुद्ध आर्य "अहिंसा परमो धर्म" असे डौलाने म्हणत शुद्ध आर्य असें समजत कीं, सर्व जगतावर आपली सत्ता असणे हा आपला अधिकार आहे, अशुद्ध आर्य असें मानीत कीं मनुष्य आणि इतर प्राणी याची योग्यता सारखीच आहे, आणि पृथ्वीमध्यें जे जें

उत्पन्न होते, त्याचा उपयोग घेण्यास दोहोंसहि सारखा अधिकार आहे. शुद्ध आर्य आपण बुद्धिवान् आहों असा अभिमान बाळगीत; अशुद्ध आर्यांस भक्ति हेंच भूषण वाटे. शुद्ध आर्य अशी इच्छा करीत कीं आपणांला प्रापंचिक आणि स्वर्गीचीं सुखें प्राप्त व्हावीं; अशुद्ध आर्य अशी इच्छा करीत की आपणांस निर्वाणावस्था प्राप्त व्हावी. निर्वाणावस्था म्हणजे काय? जिवाचें स्वातंत्र्य नष्ट होऊन तो काहींएक नाहीं अशी स्थिति. असा उद्बुध आणि संध यांमध्यें भेद होता. शुद्ध आर्यांचीं मतें एक तऱ्हेचीं पडत आणि मिश्र आर्यांचीं आणि अनार्यांचीं मते दुसऱ्या तऱ्हेचीं पडत. शुद्ध आर्यांच्या धार्मिक आणि सामाजिक धर्मसंस्थेचे नांव वैदिक धर्मसंस्था. मिश्र आर्यांच्या आणि अनार्यांच्या धर्मसंस्थेचे नाव बौद्ध धर्मसस्था. अर्वाचीन हिंदूंच्या मनावर या दोन्ही धर्मसंस्थांचा इतका दृढ संस्कार आहे कीं ते काहीं अंशीं बौद्ध सांप्रदाय आचरतात, आणि कांहीं अंशीं वैदिक सांप्रदाय आचरतात असे म्हटले तरी चालेल. पूर्वमीमांसेमध्ये वैदिक धर्मसंस्थेचे निरूपण केले आहे, आणि तिचे मंडन केले आहे. पूर्वमीमांसाशास्त्राचा कर्ता जैमिनि हे सांगण्यास नको. उत्तरमीमांसेमध्ये बौद्ध लोकांच्या मुख्य मताचा संग्रह आहे, आणि त्या मतांच्या संबंधाचे निरूपण आहे. परंतु इतकेच लक्षांत ठेवायाचें की बौद्धाचार्य वेदाचा त्याग करीत असत, आणि वेदांतवादी वेदाचा स्वीकार करतात. जैमिनिकृत शास्त्राचा अंमल अजून चालतो आहे. पुराणामध्ये ज्या व्रतांचे वर्णन केले आहे, तीं व्रते अंशतः यज्ञच आहेच. आणि हीं व्रते सर्व हिंदु लोक जपून करतात. बादरायणशास्त्राचा सर्व हिंदुस्थानभर प्रचार आहे, आणि ज्ञानगोष्टी केल्याने बहुतेक हिंदूंच्या मनांचे समाधान होते. या बादरायणशास्त्राचे निरनिराळ्या सांप्रदायाचे लोक निरनिराळ्या रीतीने अर्थ करतात. तथापि बौद्ध लोकांच्या मताच्या कलावर अद्वैतवादी शंकराचार्यांचे सिद्धांत आहेत. असा प्रकार मध्वाचार्यांचा किंवा रामानुजाचा नाहीं. तथापि शंकराचार्यांच्या सिद्धांतामध्ये भेसळ आहे. कारण स्मार्त लोक यज्ञाकरितां पशु मारतात, आणि या रीतीने वैदिक परंपरेस अनुसरतात. मध्वाचार्यांनीं वैदिक परंपरेचा स्वीकार केला आहे, परंतु

पत्तामध्ये पशु मारणें एकीकडे टाकून पिठाचा पशु आंत घुसडून बौद्ध सांप्रदायाच्या अहिंसा धर्माचा स्वीकार केला आहे रामानुज बौद्ध लोकांचा मार्ग एकिकडे सोडतो, आणि वैदिक मार्ग एकीकडे सोडतो, आणि मध्येंच विशिष्टाद्वैत सिद्धांताचें प्रतिपादन करतो अशा गडबडीमध्यें वल्लभसांप्रदाय उत्पन्न होणें हें आवश्यकच आहे शंकराचार्यांच्या; मध्वाचार्यांच्या, रामानुजाच्या आणि वल्लभाचार्यांच्या भाष्यांच्या प्रति आम्हीं मिळविल्या आहेत आणि त्यातील मुख्य मुख्य हाशिलाचीं वचनें वाचकापुढें आम्ही मांडू, आणि आवश्यक असल्यास आमचें म्हणणें काय हेंहि वाचकास कळवू प्रत्येक शास्त्रामध्यें निरनिराळ्या सिद्धांतांचें विवेचन केलेलें असतें हे सिद्धांत मनुष्याच्या पांच प्रकारच्या मनोगतापासून उत्पन्न होतात १ आपल्या सभोंवतीं जें जड दिसत आहे, आणि तत्संबंधीं चराचर संसार चालला आहे, याचा आपला संबंध तरी काय ? हें पहिलें मनोगत २ ह्या चराचर संसाराची उत्पत्ति कशी झाली, आणि तिचें मुख्य कारण काय हें दुसरें मनोगत ३ ह्या चराचर संसाराचें आणि मुख्य कारणाचें संबंध कोणते हें तिसरें मनोगत ४ मनुष्याच्या अंतर्यामीं नानाशक्ति आहेत हें स्पष्टच आहे आणि अंतरिक्षीं, आकाशीं, वायूमध्यें, अग्नीमध्यें निरनिराळ्या शक्ति आहेत हेंहि स्पष्टच आहे यांस पंडितजन आध्यात्मिक आणि आधिदैविक अशीं नावें देतात हें चौथें मनोगत ५ आणि परम सुख तें काय, मुक्ति ती काय, निर्वाण तें काय ? हें पांचवें मनोगत आहे या पांची मनोगताचा विचार केला असतां ब्रह्ममीमांसा आणि कर्ममीमांसा यांमध्यें अतिशय अंतर आहे असें अंतर कसें पडलें हें दाखविण्यास आम्हीं यत्न केला आहे पांचीहि मनोगताच्या संबंधानें जे निरनिराळे सिद्धांत उत्पन्न होतात, त्यांचें विवेचन शास्त्रामध्यें विशेष केलेलें असतें ज्या सूत्रामध्यें हे सिद्धांत बांधलेले असतात, तीं सूत्रें आम्ही वाचकांच्या पुढें मांडू ही प्रस्तावना पुरी करण्यापूर्वीं इतकें सांगितलें पाहिजे कीं पूर्वमीमांसेचा विचार केल्यानें वैदिक आणि बौद्ध सांप्रदायाचें स्वरूप नीट कळून येईल आणि इतिहासदृष्ट्या ह्या गोष्टीची योग्यता केवढी आहे हें सांगण्यास नको

अथोत्तरमीमांसा ॥

ब्रम्हसूत्रम् ॥

प्रथमाध्यायस्य प्रथमः पादः ॥

अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥ १ ॥

पदार्थः । अथ=अनन्तरम् । अतः=एतस्मात् कारणात् । ब्रह्मजिज्ञासा=ब्रम्हणो जिज्ञासा । जिज्ञासा=ज्ञातुमिच्छा ।

वाक्यार्थः । अनन्तरमेतस्मात् कारणाद् ब्रह्मणो जिज्ञासा ॥

भावार्थः । कर्मज्ञानानन्तरं वेदवाक्यविचारद्वारा ब्रह्म जिज्ञासितव्यम् । किं नाम ब्रह्मेत्युत्तरेषु सूत्रेषु परीक्ष्यते । नाना वेदान्तमार्गाः सन्ति । तत्र ब्रह्मस्वरूपनिरूपण भिद्यते । यथा । अद्वैतवादिनो वदन्ति शुद्धबुद्धमुक्तस्वभावं निर्गुण निराकारात्मस्वरूपमात्माभिन्न ब्रह्मेति । द्वैतवादिनस्त्वात्मभिन्नः सगुणः सर्वज्ञो मुक्तिदाता जगत्कर्ता मनुष्यैः सेव्यः परमेश्वरो ब्रह्मेति । विशिष्टाद्वैतवादिनो रामानुजानुयायिनो वदन्ति सगुणो जगत्कर्ता सर्वज्ञो मुक्तिदाता पुरुषोत्तमो ब्रह्म । पुनः जीवोऽपि सगुणो मुक्त्यवस्थायामीश्वरस्य स्वरूपतां प्राप्नोति । ईश्वरो जगत्कर्तृत्वेन विशिष्यत इति । वल्लभमतानुयायिनस्तु जडजीवरूपसर्वात्मकं ब्रह्म । तदश्नुते सर्वान् कामान् । तेन विविधभोगचतुरेण ब्रह्मणा सह जीवो मुक्त्यवस्थायां सर्वान् कामानश्नुते इति । एतेषां मतानामग्रे तारतम्येन निरूपणं करिष्यते ब्रम्हस्वरूपं निर्णेष्यतेच । तत्र

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सोऽश्नुते सर्वान् कामान् सह ब्रह्मणा विपश्चिता । उ० ब्र० १. ॥ ब्रह्मविदाप्नोति परम् । उ० ब्र० १. ॥ सर्वं खल्विदं ब्रह्म । उ० छां० ३.१४,१, ॥ नेह नानास्ति किञ्चन । तत् त्वमसि । उ० छां० ६.८,४. ॥ ब्रह्माहमस्मि । ब्रह्मविद् ब्रह्म भवति ॥

बादरायणकृत वेदान्त-दर्शन

१ आतां येथून ब्रह्मविचार

१ चार वेदान्तमतांचा विचार करून बादरायणसूत्रांच्या अर्थाचा निर्णय करावा असा आमचा हेतु आहे. तीं चार वेदान्तमतें येणेंप्रमाणें:—प्रथम, ज्याचें शंकराचार्यांनीं प्रतिपादन केलें व जें उत्तर हिंदुस्थानांत पुष्कळ प्रचारांत आहे, तें अद्वैतवेदान्तमत. दुसरें विशिष्टाद्वैत सिद्धान्त रामानुजानें स्थापन केला त्याचा प्रचार कावेरीतीरीं आणि तिरुपति हें जें व्यंकोबाचा गिरी व यांच्या सभोंवताल प्रांत यांत आहे. तिसरें, मध्वाचार्यांनीं स्थापन केलेला द्वैतसिद्धान्त मुख्यत्वें करून कर्नाटकांत आढळतो, परंतु भरतखंडीं सर्व ठिकाणीं या मताचे लोक थोडेबहुत आहेत. चवथें पुष्टिमार्गमत प्रतिपादन करणाऱ्या वल्लभाच्या मताचा प्रचार गुजराथेंत आहे. प्रत्येक मताचा पांच प्रकारचा विचार करावा असें आम्हीं प्रस्तावनेंत सांगितलें आहे. बादरायणाच्या ज्या ज्या सूत्रांच्या धोरणानें शंकराचार्यादि आचार्य आपआपल्या मतांचें प्रतिपादन करतात, त्या सूत्राचा अर्थ करते वेळीं त्या मताचें निरूपण आम्ही करूं. या प्रथम सूत्रीं ब्रह्म हा शब्द विचार करण्याजोगा आहे. शंकराचार्यांचे मताप्रमाणें ब्रह्म ज्ञानमय, आनंदमय आणि चैतन्यस्वरूप आहे. तें निर्गुण आणि निराकार असून पुरुषविशेष

THE BRAHMA SUTRA

1 Now then the investigation of Brahma

1 We purpose to examine the four systems of Vedânta and fix the interpretation of the sûtras of Bâdarâyana. What are these four systems of Vedânta? The first is the Advaita Vedanta which Shankarâchârya propounds and which has many adherents in Northern India. The second is the Vishishta dvaita which is propagated by Râmânuja and which prevails in the country about Tirupati the shrine of Vyankatesha known as the Vyankatesha-giri and on the banks of the Kaveri. The third is the Dvaita system which Madhvacharya inculcated and which is more or less known in all parts of India and is specially studied in the Carnatic. The fourth is the Pushti mârga a form of Epicureanism which predominates in Gujarath. We have stated in the introduction that each of these systems deserves an examination from five different points of view. We will discuss the doctrines as laid down by any of the four schools when we examine that sûtra of Bâdarâyana on which Shankarâchârya and other Âchâryas base their statements. The term in the above sûtra which calls for special examination is Brahma. According to Shankarâchârya the form of Brahma is knowledge happiness and spirituality it is without any quality and shape and is not a person it alone is real and all else is

नाही आणि हे ब्रह्मच काय ते ज्ञान आहे, आणि बाकी सर्व वस्तुमात्र मिथ्या निर्वाणावस्थेचे बौद्धलोकहि असेच वर्णन करतात तथापि शंकराचार्यांच्या अद्वैतसिद्धान्तामध्ये आणि बौद्धांच्या निर्वाणसिद्धान्तामध्ये भेद आहे त्या भेदाचे निरूपण पुढे करू पुन, विशिष्टाद्वैतसिद्धान्तवादी रामानुजाचे असें ह्मणणे आहे कीं परमेश्वर पुरुष आहे. तो सगुण आहे, जगत्कर्ता तो आहे, आणि मुक्तिदाताहि तो आहे मनुष्याचा जीवहि सगुण आहे, आणि तो मुक्त झाला म्हणजे सर्वथैव ईश्वरतुल्य होतो परंतु जगत् उत्पन्न करण्याची शक्ति मात्र त्याला नाही. पुन., द्वैतसिद्धान्त असा आहे की ब्रह्म पुरुषविशेष आहे, तो जगत्कर्ता आहे, जगन्नियंता आहे, सर्वथैव सेवा करण्यास तो योग्य आहे जीव कधीहि त्याच्या योग्यतेस पावणार नाही जीवानें नित्य आता किंवा मुक्ति प्राप्त झाल्यानंतर परमेश्वराची सेवाच करावी इतका त्याचा अधिकार आहे पुन, वल्लभमतानुयायी लोकाचें निराळेच मत आहे. जड आणि जीव असे ब्रह्माचें रूप आहे, ते ब्रह्म सर्व प्रकारच्या भोगाचा अनुभव घेतें. मुक्ति प्राप्त झाल्यानंतर जीवहि ब्रह्मासहवर्तमान सर्व भोगाचा अनुभव घेणार. अशा चार मताच्या अनुरोधानें निरनिराळ्या मताचे लोक ब्रह्मशब्दाचा अर्थ बसवितात परंतु द्वैतसिद्धान्ताचा अर्थ आम्हास समर्पक दिसतो. कारण बादरायणाच्या लेखावरून एकदर असाच अर्थ निष्पन्न होतो, असें आम्हास

false In the first stage of the development of Buddhism, the condition of Nirvâna is described in the same way There is, however, a distinction between the form of Brahma as recognized by the Advaita-school and the Nirvâna of Buddhists—a distinction which will be considered in the sequel According to Râmânuja, the promulgator of the Vishistadvaita system, Brahma is a person, possessing qualities, the creator of the world and saviour The human soul also possesses qualities and when saved, is like Brahma in every respect, except the power of creating the world According to Madhvâchârya the first known teacher of Dvaita philosophy, Brahma is personal, the creator and the ruler of the world, and in every way deserves to be worshipped the soul, never being capable of rising to equality with God, is entitled only to serve Him now in this world and when saved and in Heaven The followers of Vallabha differ from all these they believe that all the material and the spiritual is Brahma which is capable of all fleshly enjoyments The soul when saved, is to secure all enjoyments along with Brahma The term Brahma is then interpreted in their own way by all these four schools so as to suit the doctrines they preach But we believe the interpretation of the Dvaita school to be reasonable, because we think that the sûtras of Bâdarâyana sanction it We will now indicate generally the topics discussed in the system of Bâdarâyana so that the reader may find it easy to see its scope The Brahma-sûtra consists of four books in the first, Bâdarâ-

बाग्त अगू वाग्रापगाच्या मग्र्य्र आर विता विषय आला आह याचें थोडें पर्ये दिग्दर्शन केलें पाहिजे म्हणजे वाचकास विचार करण्यास बरें पडेल म एसूत्राच चार अध्याय आहेत त्यां पाहिल्या अध्यायात वेदातील आणि उप निषदातीलवाक्ये घेऊन ब्रह्मशब्दाचा अ मुख्य अर्थ अरे दाखविण्याकरिता याम रायणानें उद्योग केला आहे दुसऱ्या अध्यायामध्यें आपल्या मताशीं दुसऱ्या मताचा जितका विरोध पडतो तितक दुसऱ्या मताचें खंडण केलें आहे तीं दुसरीं मतें म्हणजे साख्य योग वैशेषिक, आ णि बौद्ध इत्यादि तिस ऱ्या अ याया मध्यें वैराग्य याचा विचार आहे चौथ्या अध्यायामध्यें जीव मु क्त झाला म्हणजे त्याची स्थिति कशी होते, आणि मुक्तीचें स्वरूप काय आहे याविषयीं विचार आहे या सव गोष्टी चें महत्व मग सांगावयास नको पण इति हासरूपानें वदद आहे हे सागावयास नको युनानी देशातील स्टोइक झानो, एपिक्युअर, प्लेटो, आणि साक्रटिस याच्या मताचा विचार करून याचा प्रचार या देशीं पुष्कळ चालला आहे पण निदान त्याच्या इतके प्रबल विचार करणारे पण्डित या भरतखंडीं झाले, असे भार तवर्षातील लोकास ठाऊक नसावे हें निदान आश्चर्य तरी आवश्यक आहे या दोन्ही भरतखंडाच्या आणि युनानी आर्यांच्या मताचा मतभेद दाखविल्यानंतर असे आश्चर्य वाटण्याचे विशेष कारण आहे हे वाचकांच्या लक्षात सहज येईल

yana quotes a varie y of passages from the Vedas and Upanisads and attempts to fix the sense of the term Brahma in the second he refutes the doctrines of such schools of philosophy as Bouddha Sânkhya Yoga and Vaisheshika when they are in any way opposed to his system in the third the nature and the conditions of Vairâgya—self abnegation—are investigated and in the fourth the condition of the soul when saved is examined and spiritual emancipation is enlarged upon We need not mention that the importance of the study of these sys

I picure Socrate and Plato The ignorance of our countrymen of the doctrines of thinkers equally profound and sound if not more excites at least our surprise the grounds of which the reader will perceive when the distinctions and identity of Indian and Hellenic thought are pointed out We will translate the texts from the Vedas and Upanisads which we have quoted in the Sanskrita portion of our work on which the statements of Vedântic teachers *are based and the signification* of which is discussed to adapt them to the doctrines of a particular school "Brahma is

—in the highest heaven He enjoys all enjoyments along with skilful Brahma (He) who knows Brahma obtains the highest All this (is) indeed Brahma Any thing here is not various That thou art I am Brahma 'He who knows

सूत्राणि.

जन्माद्यस्य यतः ॥ २ ॥

पदानि । जन्मादि, अस्य, यतः, ॥

वाक्यार्थः । यतो जन्मादि अस्य (तस्य नाम ब्रम्ह) अस्य प्रत्यक्षस्य चिन्त्यस्य च उत्पत्तिस्थितिलय यस्मात् कारणात् तद् ब्रम्ह ॥

भावार्थः । द्वैताद्वैतविशिष्टाद्वैतवल्लभमतानुयायिना स्वमतानुरोधेनास्य सूत्रस्यार्थः कर्तुं शक्यते । अद्वैतमते जीवब्रह्मणोरभेदः चैतन्यरूपं ब्रम्ह सत्यं । जगत् मिथ्या । द्वैतमते तयोर्भेदः ब्रम्ह सत्य । जगदपि सत्यम् । विशिष्टाद्वैतमते सगुण ब्रम्ह सत्यं । जगत् मिथ्या । सगुणजीवस्य सगुणब्रम्हणश्चाभेदः । वल्लभानुयायिनां तु यत् प्रत्यक्षं जडात्मकमिदं जगत् तदेव ब्रम्ह नित्य सत्य च । जन्म लयश्च केवलमाविर्भावतिरोभावौ ॥

उपनिषद्वाक्यान्यनुसन्धेयानि

यतो वा इमानि भूतानि जायन्ते येन जातानि जीवन्ति । यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रम्हेति । उ० भृ० १. ॥ आनन्दाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते । आनन्देन जातानि जीवन्ति आनन्दं प्रयन्त्यभिसंविशन्तीति । उ० भृ० ६. ॥

संस्कृतामध्ये जी वेदांतलीं आणि उपनिषदांतली वाक्ये दिली आहेत, आणि ज्यावरून वेदांतवादी लोक आपआपल्या मताचे सिद्धांत बांधतात, आणि ज्यावरून वेदांतांत मोठा वाद उत्पन्न होतो, त्या वाक्याचें आम्ही भाषांतर करतो "ब्रह्म (हें) सत्य, ज्ञान, आणि अनंत (आहे). हृदयरूप, उत्तम आकाशरूप गुहेमध्ये ठेवलेले (जे ते) जो जाणतो." "चतुर ब्रह्मासहवर्तमान तो सर्व

Brahma becomes Brahma" We shall have ample opportunities of pointing out in the sequel the different interpretations of these texts as insisted upon by different schools of Vedântic teachers.

२ ज्यापासून ह्याचें उत्पत्त्यादि होतें

मोग अनुमतिने ' ब्रह्म [illegible] उत्तम न मिळत " हें सत्र [illegible] ब्रह्म " " सर्वं [illegible] नाहिं ", [illegible] " ' मी ब्रह्म आहे " [illegible] ब्रह्म [illegible] ' हीं वाक्य [illegible] वरील [illegible] अर्थ [illegible] आम्ही पुढें [illegible]

[illegible] घाचे [illegible] आवरण [illegible] जें [illegible] दिसतें त्या पदार्थ, [illegible] उत्पत्ति, स्थिति आणि लय, असा [illegible] अर्थ आहे [illegible] मताप्रमाणें [illegible] आत्मस्वरूपा [illegible] अर्थ [illegible] आणि असें [illegible] आहे अद्वैतवादी असें [illegible] की, " हें जगत [illegible] आहे [illegible] मायेचें [illegible] पडलें (असा [illegible] आवरण असें म्हणतात) आणि मग असा [illegible] झाला असा [illegible] अद्वैतवादी विवर्त असें [illegible] शुद्ध चैतन्याचें आवरण करावें अशी एक शक्ति आहे आणि मग [illegible] आपल्या पुढें उभें रा हिलें आहे असें भासतें ' पुन द्वैत मताचे [illegible] असें म्हणतात की -" हें जगत् हें [illegible] आहे आणि [illegible] म्हणजे पुरुषोत्तम परम [illegible], हा माळ्या [illegible] करता आहे [illegible]

2 Whence of this the origin and the rest

the distinction between wakefulness and a dream does not exist in the case of the Supreme Spirit God is himself flame Joy experienced in a dream is the joy of the Supreme Spirit manifested This is the form of the Supreme Spirit How is the Supreme Spirit ever in a condition of a sound sleep? The Supreme Spirit never feels a desire, and in a sound sleep nothing whatever is felt In this way the four conditions are described in the Upanisads and a distinction between the human spirit and the Supreme Spirit is

४३ पति आणि दुसऱ्या शब्दांचा प्रयोग केला आहे म्हणून ब्रह्माचें निरूपण आहे

नाहीं, आणि सुषुप्त्यवस्थेत जीवात्मा प्रकाशित होत नाहीं अशा प्रकारें यांत हि अवस्थेंतील भेदानें जीव आणि परमात्मा यांच्या भेदाचें निरूपण उपनिषदांत आहे या भेदावरून जीवात्मा ठरून त्याच्या उपनिषदांमध्यें जीवाचें निरूपण आहे असें म्हणतात पण तसें नव्हे, कारण ब्रह्माचें प्रकरण चाललें आहे सुषुप्ति अवस्थेमध्यें किंवा जीवात्मा उत्क्रमणसमयीं जीव आणि परब्रह्म यांमध्यें भेद आहे तो भेद ध्यानांत ठेऊन ब्रह्मनिरूपण आहे असा सिद्धांत करण्याचा याजवर रामानुज म्हणतात –सुषुप्ति आणि उत्क्रमण या स्थितींत असलेल्या जीवात्म्याशीं दून अर्थांतर करून परमात्म्याचें निरूपण केलें आहे म्हणून परमात्मा भिन्न आणि जीवात्मा भिन्न याजवर मध्वाचार्य म्हणतात –भेदाचें निरूपण आहे म्हणून जीव आणि परमात्मा एक न हेत परमात्मा सर्वज्ञ आहे म्हणून निरनिराळ्या अवस्थेंचें अवलोकन करणें हें त्या मध्य त्याचें

४३ पति वशी इशान अधिपति इत्यादि शब्दांचा उपनिषदांमध्यें प्रयोग झाला आहे म्हणून परब्रह्माचाच निर्देश झाला आहे इतका सूत्रार्थ याजवर शंकराचार्य असें म्हणतात कीं हे जे शब्द आहेत त्यांनीं परब्रह्मानेंच प्रतिपादन

(१—४)

43 Such terms as *Lord* and others are used, therefore, the Supreme Spirit is described

made for the purpose. Laying stress upon such a distinction some state that the human spirit alone is described in the Upanisad but such a view is not correct because the context refers to Brahma. There is a distinction between the human spirit and the Supreme Spirit so far as a sound sleep and separation from the human body are concerned This distinction being borne in mind, the conclusion is —the Upanisads describe the Supreme Spirit alone. Upon this Râmânuja observes —referring to the condition of a sound sleep and final separation from the human body the Supreme Spirit is described by a change of sense without a reference to the human spirit Hence then the human spirit is distinct from the Supreme Spirit Upon this Madhvâchârya observes —a distinction is made Hence the human spirit and the Supreme Spirit are not identical The Supreme Spirit or Lord God is omniscient. Hence it is in his power to be cognizant of different conditions

43 In the Upanisads such terms as Lord Powerful an Independent Leader Ruler Lord of lords and others are used Hence they point to the Supreme Spirit This is the sense of the sûtra Upon this Shankarâchârya observes —all these terms refer to the Supreme Spirit and not to the human spirit Upon this Râmânuja observes —even

झाले आहे. जीवाचे प्रतिपादन झाले नाही. रामानुज यावर असे म्हणतात की जगताचा पति, जगताला धारण करणारा, सर्वेश्वर, असलें सामर्थ्य मुक्त झालेल्या हि जीवाच्या अंगी नाही. म्हणून मुक्त झालेल्या जीवास सोडून अर्थ फिरवून नामरूपाला वाहणारे जे आकाश तें परब्रह्म असा सिद्धांत केला आहे. मग ब्रह्म आणि जीव एक असे जे निरूपण आहे त्याची व्यवस्था काय? सर्व चैतन्य आणि अचैतन्य जे कांही तें सर्व ब्रह्मानेच निर्माण केले आहे. म्हणून त्यामध्ये आणि ब्रह्ममध्ये कार्यकारणसंबंध आला कारणात्मक कार्य असते म्हणून ब्रह्म आणि जीव एक असे निरूपण करतात. यावर वल्लभाचार्य असे म्हणतात की 'वशी' आहे, 'अधिपति' आहे अशा शब्दाचा प्रयोग केला आहे म्हणून ब्रह्माचे निरूपण आहे हे स्पष्ट मध्वाचार्य असे म्हणतात की सर्वांचा 'अधिपति, सर्वांचा ईश्वर तो वा हा; हे दिसते हे तो नव्हे नव्हे.' अशा शब्दाचा प्रयोग केला आहे म्हणून नित्य ज्याचा महिमा असा विष्णुच तो असे समजावे. या संबंधी उपनिषद्वाक्ये आहेत त्याचे भाषांतर एणेप्रमाणे "सर्व त्याच्या स्वाधीन, सर्वांचा ईश्वर, सर्वांचा अधिपति; तो चांगले कर्म केल्याने मोठा होत नाही, वाईट कर्म केल्याने लहान होत नाही."

the emancipated soul—the human spirit in the condition of salvation—is not the lord of the universe, and can neither sustain, nor rule over, the universe Hence by a change of sense, æther, described as conveying all names and forms, refers to the Supreme Spirit and not to the human spirit But how is the proposition that the human spirit and the Supreme Spirit are identical—a proposition always laid down in the Upanisads—to be interpreted? All substances, spiritual and material, are created by the Supreme Spirit Hence the relationship between the two is that of cause and effect, and because an effect partakes of the nature and the essence of a cause the Supreme Spirit is often stated to be identical with the human spirit Upon this Vallabhâchârya observes —it is at once evident that such terms, as powerful and independent leader, Lord-of-lords, used in the Upa-nisads, refer to the Supreme Spirit Madhvâchârya observes —such a description as the following occurs in the Upanisads—He is the great lord of all, He is the ruler of all, well then, He is this. Whatever is seen is not He. Hence the conclusion is—Visnu, whose glory is eternal, is described The following is the translation of the Upanisad-texts quoted "All is in his power, the ruler of all, the lord of all, who is not magnified by performing good works, and who does not suffer by performing evil deeds"

उपसंहार.

यज्ञरूपाचा विचार ब्राह्मणांत केला आहे त्या विचाराचा पद्धत कल्पसूत्रां मध्यें यज्ञ संबंधीं अनुक्रम बांधला आहे तसेंच उपनिषदांमध्यें जो ब्रह्मविचार आहे त्याविषयीं अनुक्रम ब्रह्मसूत्रांत बांधला आहे पूर्वमीमांसाशास्त्रामध्यें प्रवृत्ति मार्गाचा विचार आहे ब्रह्मसूत्रा मध्यें निवृत्तिमार्गाचा विचार आहे असा पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा यांचा संबंध आहे दहा उपनिषदें मुख्य समजण्याचा संप्रदाय आहे तीं हीं छांदोग्य, बृहदारण्यक, ऐतरेय तैत्तिरीय, ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड आणि मांडूक्य या उपनिषदांचा संबंध चाराहि वेदांशीं आहे अनुक्रमें वेदांशीं असा उपनिषद् हे पुढील प्रमाणावरून समजेल ऋग्वेदाचें १ ऐतरेय, तैत्तिरीय किंवा कृष्ण यजुर् २ तैत्तिरीय, शुक्ल किंवा वाजसनेयाचीं ३ ईश, ४ बृहदारण्यक, आणि ५ कठ, सामवेदाचीं, ६ छांदोग्य आणि ७ केन, आणि अथर्व वेदाचीं ८ प्रश्न ९ मुंड आणि १० मांडूक्य छांदोग्य उपनिषदांतील बहुतेक वाक्यें या पादांत घतलीं आहेत म्हणून छांदोग्य उपनिषदांत काय काय आहे याचें संक्षेपतः थोडें मनन करतों प्रथमतः ॐकाराची उपासना कशी करायाची? साम गातांना जसें ध्रुपदा मध्यें उंच स्वरानें अस्ताई म्हणावी लागते तसा म्हणण्याचा एक तुकडा आहे त्या तुकड्याचें नाव उद्गीथ हें असें म्हणायाचें

SUMMARY

The sacrificial system is explained in the Brâhmana literature These explanations are systematized and generalized in the Kalpa-sûtra-literature In like manner the Vedânta philosophy is explained in the Upanisad literature, and the explanations are systematized and generalized in the Brahma-sûtra. The former constitutes the Purva-Mimânsâ and the latter Uttara-mimânsâ The one inculcates the principles of ethics, social religious and political and thus recognizes active life The other inculcates self-abnegation contemplation and recognizes retirement from the world as the highest duty Such is the relationship between the Purva and Uttara mimânsâ. Ten Upanisads are considered to be principal and authoritative These are—Chhândogya Brihadâranyaka Aitareya Taittiriya, Isha Kena Katha Prashna, Munda and Mândûkya. These Upanisads are connected with all the four Vedas. The sequel will show this connection The Aitareya-Upanisad belongs to the *Rig*-Veda, Taittiriya to the Black Yajur-Veda, Isha Brihadâranyaka and Katha to the White-Yajur Veda Chhandogya and Kena belong to the Sâma Veda Prashna Munda and Mândûkya belong to the Atharva-Veda The Chhândogya Upanisad is largely quoted in the First Chapter of the Brahma sûtra. We will therefore, explain succinctly what its contents are How is the Omkâra to be worshipped? As the first part called Astâi of

आणि याची उपासना कशी करायाची हा विचार. जाता जाता असें सागणे प्रशस्त वाटते की आम्ही जो गान शास्त्राचा शोध केला त्यावरुन असे निष्पन्न झाले की साम म्हणण्याचे तऱ्हेपासूनच ध्रुपद म्हणण्याची तऱ्हा उत्पन्न झाली. शिलक, दाल्भ्य, आणि जैवलि यानी असा सवाद करून ठरविलें की आकाश हे एक ब्रह्मच आहे. उषस्ति हा कोणी एक दरिद्री ब्राह्मण होता तो दारिद्र्याने पीडित होऊन हस्तिपाल नावाच्या राजाकडे गेला होता. तेथे यज्ञ चालला होता. जे लोक गान करीत होते त्यास तत्व समजत नाही असे दाखवून प्रस्ताव, उद्गीथ, आणि प्रतिहार म्हणजे काय हें दाखवून त्याचा–प्राण, आदित्य, आणि अन्न–याशी कसा सबध आहे हें उषस्तीनें वर्णिलें. कुत्र्यानी उद्गीथ उपासना म्हणजे काय हें सागून सामाच्या निरनिराळ्या भागाची उपासना अशी करायाची हें सागितलें आहे. इतका हा पहिला अध्याय.

पुढें निरनिराळ्या दृष्टीनें पचविध सामाची उपासना कशी करायाची? पचविध साम म्हणजे ज्यामध्ये हिंकार, प्रस्ताव, उद्गीथ, प्रतिहार, आणि निधन ही पाच अगे असतात. निरनिराळ्या दृष्टीने म्हणजे कसे? साधूच्या दृष्टीने समस्त सामाची उपासना करायाची. लोकदृष्ट्या, वृष्टिदृष्ट्या जलदृष्ट्या, ऋतुदृष्ट्या, पशुदृष्ट्या, प्राणदृष्ट्या, पचविध सामाची उपासना करायाची. म्हणजे विचाराचा प्रबोध करून, चित्ताचा सं-

a popular system of music known as Dhruvapada is sung in a higher key, so in Sâma-music a piece is sung in a higher key—a piece which is called Udgîtha How this udgîtha is to be sung and to be propitiated or adored is explained By the way it is necessary to state that all our examination of Indian music, ancient and modern, tends to prove that the system of music called Dhruvapada has originated in the Vedic system of music known as Sâma-Veda The Chhândogya-Upanisad proceeds to state that the Âchâryas—Shilaka, Dâlbhya, and Jaibali—discussed the subject and came to the conclusion that aether is Brahma or the Supreme Spirit There was an indigent Brâhmana of the name of Usasti Pressed by poverty, he went to the king of the name of Hastipâla, who was engaged in performing a sacrifice Usasti pointed out that the Sâma-singers at the sacrifice did not understand the essence of music, and that the three parts of a Sâma-song, called in order Prastâva (beginning), Udgîtha (high key), and Pratihâra (conclusion), are connected respectively with Breath (Prâna) with the Sun (Âditya), and with Food (Anna). Dogs, the Chhândogya states, explained how the different parts of the Sâma such as the Udgîtha, were to be propitiated This is the first Adhyâya of the Chhândogya-Upanisad

From different points of view, the adoration of Panchavidha-sâma is explained—the Panchavidha-sâma consisting of Hinkâra, Prastâva, Udgîtha, Pratihâra, and Nidhana. What are the

घेऊन मोहून टाकून, चित्तवृत्ति पावन प्रसन्न व उदार करावी हे सामज्ञ्याचा प्र यत्न करावा. सप्तविध सामांची उपासना करावी. सप्तविध साम म्हणजे काय? ज्यामध्यें हिंकार, प्रस्ताव, आदि, उद्गीथ प्रतिहार उपद्रव, निधन, हीं सात असतात. आदित्यरूपानें सप्त विध सामाची उपासना करावी. असा प्रकार ब्रह्मोपासनेचा. विचार करून गायत्र साम रथंतर साम, वामदेव्य साम, वैरूप्य साम, वैराज साम या ज्या गाण्याच्या निरनिराळ्या तऱ्हा यांना प्राण, पर्जन्य ऋतु यांच्याशीं संबंध लावून यांची उपासना कशी करावयाची इत्यादि विषय दुसऱ्या अध्यायामध्यें आहेत. आदित्य दक्षिण दिशा, उत्तर दिशा, पूर्वदिशा इत्यादिकांमध्यें मध आहे असें चित्तामध्यें नीट बिंबवून घेऊन ब्रह्माची ओळख करून घ्यावयाची.

ही ब्रह्माची ओळख करून घेण्याची पद्धति अशी आहे. जो विषय आपणास पक्का विदित आहे तो विषय घेऊन हळू हळू दृष्टि पसरून, सर्वव्यापि निष्कलंक असें जें ब्रह्म त्याचें आकलन करण्याची चित्तास शक्ति आणावयाची. जें ज्ञात त्याच्या धोरणानें अज्ञातांचें आकलन करणें. ज्ञातावांचून अज्ञात कधींहि समजावयाचें नाहीं. ब्रह्मांडामधील विषयांचे दोनच प्रकार आहेत एक ज्ञात आणि दुसरा अज्ञात. असा हळू हळू चित्ताचा प्रसार करून नाना तऱ्हेनें त्याची दृष्टी फांकून त्यापुढें शाण्डिल्य-विद्या सांगितली ती अशी कीं जीवात्मा तोच परमात्मा

different points of view? The whole system of Sâma music is to be adored because it is good. The Panchavidha Sâma system is to be adored, being considered as the people, as rain, as water, as seasons, as breath. That is the power of reflection is to be cultivated, the feelings are to be restrained and to be enlarged and thus an attempt is to be made to comprehend the form of Brahma or the Supreme Spirit. The Saptavidha Sâma is to be adored—the Saptavidha-Sâma consisting of Hinkara, Prastâva, Âdi, Udgîtha, Pratihâra, Upadrava and Nidhana. The Saptavidha-Sâma being considered as the Sun is to be adored. Suffice it to remark that in like manner the different kinds of Sâma-music such as Gayatra, Rathantara, Vâmadevya, Vairupya, Vairaja, are to be connected with Breath, Rain and Seasons and are to be adored. It is to be carefully impressed upon the mind that there is honey in the Sun, in the south, in the north, and in the east that Brahma or the Supreme Spirit may be known. This is the second Adhyâya.

What is the method of knowing Brahma? The mind is gradually to be enabled to comprehend Brahma stainless and universal by enlarging the mental vision directing it to the unknown by means of the known. This is what is grasping the unknown through the known. Of course the unknown cannot be known but through the known. All objects in nature are to be divided into two classes—either known or unknown. Thus the Shândilya system of knowledge,

यज्ञाची आणि आत्ममीमांसेची एक वाक्यता करून आंगिरसानें देवकीपुत्र जो कृष्ण त्यास उपदेश केला. आणि अमुक आधिदैविक, अमुक आध्यात्मिक, अमुक आधिभौतिक असा ब्रह्मांडातील विषयाचा विभाग करून ब्रह्माची उपासना कशी करावी याचा उपदेश केला. इतका हा तिसरा अध्याय.

जानश्रुति म्हणून कोणी एक राजा होता. त्याला हंसानीं दूषण दिले. त्यावरून तो जागृत होऊन रैक नावाच्या ब्राह्मणाकडे गेला तो ब्राह्मण अति दरिद्री होता. त्याची जानश्रुतीनें नानातऱ्हेने अर्जवे केली. आणि त्यापासून संवर्गविद्या संपादन केली. संवर्गविद्या म्हणजे काय? जें काही आहे ते सर्व वायुच. जाबाल नावाचा कोणी एक मुलगा होता. त्याला आपले गोत्र काय हें ठाऊक नव्हते. इतकेच काय, पण आपली जाति काय हेहि त्यास ठाऊक नव्हतें. असें असता तो गौतम नावाच्या ब्राह्मणाकडे गेला. गौतमानें त्याचे उपनयन करून त्यास विद्या शिकविली चारशें रोडक्या गायी गौतमाने त्याच्या स्वाधीन केल्या, आणि त्याला सांगितले की हजार झाल्या म्हणजे तू परत ये; म्हणजे मी तुला ब्रह्म म्हणजे काय हें सांगेन तो गायी चारीत असता बैलाने, अग्नीने, हंसाने, आणि जलचराने म्हणजे वायु, अग्नि, सूर्य, आणि प्राण यानी जाबालाला ब्रह्म म्हणजे काय याचे थोडे निरूपण केले मग तो गुरुकुली परत आला आणि गौतमाने त्यास ब्रह्मविद्या शिकविली.

or the system of knowledge inculcated by Shândilya is placed before the mind, gradually awakening it and enlarging its vision Shândilya inculcated that the human spirit is the Supreme Spirit Angirasa taught Krisna, son of Devaki, harmonizing the sacrificial and Vedânta-systems of philosophy, and explaining the distinction between the physical, psychical, and theological elements of knowledge, and the method of adoring the Supreme Spirit This is the third Chapter.

There was a prince of the name of Jânashruti While asleep, he was found fault with by swans. Being awakend, he went to the Brâhmana of the name of Rainka, who was extremely poor Jânashruti served him in various ways, and learnt from him what is called the Sanvarga-system of knowledge What is it? That whatever exists is air, is the fundamental principle of the Sanvarga-vidyâ. There was a boy of the name of Jâbâla, who did not know what his clan (Gotra) was, and to what caste he belonged He went, however to a Brâhmana of the name of Goutama Goutama invested him with the sacred thread and received him as a pupil He entrusted him with four hundred lean cows, and told him to return, when they had become one thousand, adding that Brahma would be explained to him then While grazing the cows, a bullock, Agni, a Swan, and an aquatic animal, that is, air, fire, the Sun, and breath hinted to Jâbâla what Brahma was Then he returned to the house of Goutama, his preceptor, and Goutama explained to him Brahma.

पुढें जाबालाचा शिष्य उपकोसल या नांवाचा होता त्याला जाबालानें आत्मविद्येविषयीं उपदेश केला. त्यामध्यें गार्हपत्य, दक्षिणाग्नि आणि आहवनीय यांचा आणि अग्निविद्येचा संबंध दाखविला. पुढें डोळ्यामध्यें जी आकृति दिसते, ती काय आहे यानें निरूपण करून आणि शरीर आणि यज्ञ यांचा संबंध दाखविला. असा हा चवथा अध्याय.

एक इंद्रिय म्हणतें मी मोठें, दुसरें म्हणतें मी मोठें असा इंद्रियांचा संवाद झाला. प्राणाचें अन्न काय आणि प्राण कोठें राहतो असा वाद उत्पन्न झाला. पुढें श्वेतकेतु आणि प्रवाहण यांमध्यें पंचाग्निविद्या कोणती याविषयीं संवाद झाला. लोक, पर्जन्य, पृथ्वी, पुरुष, नारी हा निरनिराळ्या अग्नींचीं रूपें सांगितलीं, परंतु जें सामर्थ्य अग्नीत आहे, वास्तविक म्हटलें म्हणजे आत्मविद्या काय ती श्रेष्ठ; कर्म श्रेष्ठ नव्हे. औपमन्यव, सत्ययज्ञ, इंद्रद्युम्न, जनक, बुडिल आणि उद्दालक यांनीं निरनिराळ्या रीतीनें कैकेयाशीं संवाद केला आणि त्या संवादामध्यें आत्मा कोण, ब्रह्म काय, हें ठरविण्याविषयीं ते प्रवृत्त झाले. या संबंधानें त्या सर्वांचा एक मोठा वाद झाला आणि शरीराच्या निरनिराळ्या शक्तींशीं संबंध लावून जें अग्निहोत्र कल्पिलें आहे त्याचें उपपादन केलें आणि महाराष्ट्र ब्राह्मण जेवावयास बसावयाच्या वेळीं प्राणाहुति ज्या घेतात त्यांचा या आध्यात्मिक अग्निहोत्राशीं संबंध आहे, असें दाखविलें आहे. या

Jâbala had a disciple called Upakosala whom he instructed in spiritual knowledge pointing out the relationship between knowledge of fire (Agni vidya) and the sacrificial fires—Gârhapatya, Dakṣiṇâgni and Âhavanîya, explaining the nature of the figure seen in the human eye and establishing a relationship between the human body and a sacrifice. This is the Fourth Adhyâya.

All the human senses disputed—each asserting its own superiority. The questions raised were—what is the food of breath (Prâṇa)? and where does it dwell? Shvetaketu and Pravâhana discussed what is the Panchâgni vidya. The people, rain, the earth, man and woman—these were stated to be the five forms of Agni (fire) but really speaking *Agni (fire)* essentially dwells in them. Thus then spiritual knowledge is superior and not sacrificial activity. Oupamanyava, Satya-yajna, Indra dyumna, Janaka, Budila, and Uddâlaka disputed in different ways with Kaikaya and sought to determine—what is the soul and what is Brahma. Thus a controversy *took* place among them and they explained away the Agnihotra sacrifice referring its different parts to the powers of the human body. Mahârâstra Brâhmanas take small morsels when they begin to take a meal. These morsels are called Prana-hutis (oblations to breath) and are connected with spiritual Agnihotra-sacrifice which *is described* in the Nârâyana-Upanisad. The small morsels which the Maharastra Brahmanas take are

अध्यात्म अग्नीहोत्राचे वर्णन तैत्तिरीय शाखेसंबंधी नारायण उपनिषदात केले आहे. ब्राह्मण जेवायास बसते वेळी प्रथम भाताचे लहान लहान घास घेतात, त्या आहुति आहेत अशी कल्पना करतात त्या आहुति या— प्राणाय स्वाहा, अपानाय स्वाहा, व्यानाय स्वाहा, उदानाय स्वाहा, समानाय स्वाहा इतका हा पाचवा अध्याय.

आरुणि श्वेतकेतूला उपदेश करतो. त्या उपदेशामध्ये प्रपंच काय, सृष्टीचे तत्त्व काय, सूक्ष्म म्हणजे काय, स्थूल म्हणजे काय, याचे निरूपण करून या साऱ्या ब्रह्मांडामध्ये सत्यवस्तु म्हणून एकच आहे; असे दाखविण्याकरता आरुणि उपपादन करू लागला ते असे अन्न, पाणी, आणि तेज, ही मनुष्य सेवन करतो. अन्नापासून त्याचें मन उत्पन्न होते हे कसे? खाल्लेल्या अन्नाचे शोधन होऊन होऊन त्यास अतिसूक्ष्म जो तवंग येतो तेच मन. अशाच रीतीने पाण्याचा तवंग तो प्राण, आणि तेजाचा तवंग ती वाक्शक्ति. पुरुषामध्ये सोळा निरनिराळ्या कला असतात. असा एक सिद्धांत करून मग गाढ झोप जी मनुष्यास लागते ती काय, स्वप्ने जी मनुष्यास पडतात ती काय, याविषयी उपपादन करताना आत्मा हा अतिसूक्ष्म आहे, सर्व ब्रह्मांडातील वस्तुमात्र आत्मस्वरूप आहे असे निरूपण केले आहे हे निरूपण करताना तत् त्वमसि म्हणजे ते तू आहेस या महावाक्याचा उच्चार दाहा पाच वेळ झाला

considered to be oblations to the different forms of the air in the human body The following are the terms used. "Prânâya svâhâ, (Svâhâ to the air in the heart), Apânâya Svâhâ (Svâhâ to the lower air), Vyânâya svâhâ (Svâhâ to the air which pervades the whole human body) Udânâya-svâhâ (Svâhâ to the upper air), and Samânâya-svâhâ (Svâhâ to the central air)" This is the Fifth Adhyâya.

Âruni instructed Shvetaketu, explaining the nature of active life, the essence of creation, its subtle power, and its gross power, and asserting that there is only one essentially true substance in the whole universe He explained this in the following way Man consumes food, water, and light. The food he takes forms his mind. How is this? The food, he takes, is purified, and by the processes which it undergoes during digestion, it produces a thin film which is the mind A thin film similarly produced is a vital air, and a thin film similarly produced by light is the power of speech The proposition that there are sixteen phases of human beings is laid down, and the questions are raised—'what is a soundsleep? what is a dream?' In answering these questions it is stated that the human spirit is an extremely subtle substance, and all things in nature partake of it In the course of this explanation the important text "that thou art" (Tattvamasi)—is pronounced about ten times Âruni offers a number of illustrations to establish his proposition These are as follow The first, of a river, the second, of the fruits of a tree, the third, the fruit

आहे आणि हा सिद्धांत स्पष्ट करण्या करतां आरुणीनें निरनिराळे दृष्टांत दिले आहेत ते असे एक नदीचा दुसरा, आंब्याच्या फळाचा तिसरा वडाच्या फळाचा, चवथा पाणी आणि मीठ मिळविण्याचा पाचवा गंधारदेशाहून आलेल्या एका पुरुषाचा, सहावा मरणास टेकलेल्या पुरुषाचा आणि सातवा चोर दिव्य करतो त्याचा यांतील एका दृष्टांताचें विवेचन केलें म्हणजे सगळ्या दृष्टांतांचें स्वरूप कळेल. थोडें मीठ घेऊन पुष्कळ पाण्यामध्यें मीठ टाकलें, मग तें पाण्याशीं मिसळून गेलें मग अति सूक्ष्म एक पाण्याचा बिंदु घेतला त्याच्यामध्यें मीठ आहे की नाहीं हें पाहूं गेलें असतां कांहीं दिसत नाहीं परंतु अतिसूक्ष्म बिंदु तोंडांत घातला असतां तो खारट लागतो असा हा अणिमा आहे हें त्याचें स्वरूप हें आत्मस्वरूप. येणें प्रमाणें हा साहावा अध्याय.

सातव्या अध्यायामध्यें सनत्कुमारानें नारदास उपदेश केला आहे नामापेक्षां वाणी व्यापक, वाणीपेक्षां मन व्यापक मनापेक्षां संकल्प व्यापक संकल्पापेक्षां चित्त व्यापक, चित्तापेक्षां ध्यान व्यापक ध्यानापेक्षां विज्ञान व्यापक विज्ञानापेक्षां बळ व्यापक, बळापेक्षां अन्न व्यापक, अन्नापेक्षां उदक व्यापक, उदकापेक्षां तेज व्यापक तेजापेक्षां आकाश व्यापक, आकाशापेक्षां स्मरण व्यापक, स्मरणापेक्षां आशा व्यापक आशेपेक्षां प्राण व्यापक असें सारें धोरण आणून माणावर लावलें आहे पुढें सत्य म्हणजे

of a tree called the Indian fig tree the fourth of water and salt mixed up, the fifth of a person who has arrived from a country called Gandhâra (Kandahar), the sixth of a person on the point of death and the seventh of a thief performing an ordeal The nature of all these illustrations will be easily understood if only one of them is explained A little salt is taken and is put in a large quantity of water A drop of water is then taken On examination one does not see any salt in the minutest drop of water Yet when it is put into the mouth, one feels the taste of salt. Thus the salt mixed up with water is divided into most minute parts This is what is called subtle minuteness This is the form of the spirit. These are the contents of the Sixth Adhyâya.

In the Seventh Adhyâya Sanatkumâra instructs Nârada Speech pervades more space than a name Mind is more pervading than speech The will is more pervading than the mind Thought is more pervading than the will Contemplation is more pervading than thought. Pre-eminent knowledge is more pervading than contemplation Power is more pervading than pre-eminent knowledge Food is more pervading than power Water is more pervading than food Light is more pervading than water Æther is more pervading than light Memory is more pervading than æther A desire is more pervading than memory A vital air is more pervading than a desire Thus all the explanation is brought to bear up

काय, विज्ञान म्हणजे काय, मति म्हणजे काय, श्रद्धा म्हणजे काय, निष्ठा म्हणजे काय, कृति म्हणजे काय, सुख म्हणजे काय, सर्व ब्रह्माण्डव्यापक वस्तु विशेष आहे ते काय, असे निरूपण करून अन्तर्मुख होऊन ध्यानस्थ झाले असता आपणामध्येच तो सर्वव्यापक आत्मा आहे असा साक्षात्कार होतो. एवढेच नाही, तर सर्वत्र तो आहे असा साक्षात्कार होतो. इतका सातवा अध्याय.

हृदय-आकाशामध्यें ब्रह्म आहे, ब्रह्माचें स्वरूपच हृदय-आकाश आहे, असत्य हा उपाधि सत्याच्या पाठीमागे लागला आहे तो ओळखून सत्याची उपासना करायाची; नामाची उपासना करायाची. आत्मा हा सर्व ब्रह्माण्डाचा सेतु आहे, असे समजून त्याची उपासना करायाची. यज्ञ, सत्रायण, मौन, उपाशी राहणे, अरण्यात जाणे ही निरनिराळी ब्रह्मचर्यें आहेत. हृदयामध्यें नाडी आहे तीच सूर्याची किरणे असे समजून चित्त फाकून टाकायाचे. आणि चित्ताची उन्नति करायाची. इन्द्र आणि बलीचा बाप विरोचन हे दोघेहि प्रजापतीकडे गेले. पाण्याच्या पात्रामध्ये आत्मसाक्षात्कार झाला. शरीरच आत्मा असे समजून विरोचन स्वस्थ राहिला. इन्द्रास संशय उत्पन्न झाल्यामुळे तो प्रजापतीकडे पुन. पुन आला. स्वप्न म्हणजे काय, आणि त्यामध्ये आत्म्याची अवस्था काय, गाढ निद्रा लागली असता आत्म्याची अवस्था काय, हे शरीर मर्त्य आहे, आत्मा शाश्वत आहे, काळ्याचे

on a vital air Next the following questions are answered. What is truth? What is pre-eminent knowledge? What is thought? What is faith? What is devotion? What is an act? What is happiness? What particular substance pervades the whole universe? Then one directly sees the all pervading spirit in himself, when he contemplates himself by looking in upon himself Not only this but he sees that the spirit pervades the whole universe.

Brahma abides in the *æther* within the heart Nay, the form of Brahma is the *æther* within the heart The counteracting cause which is known as Upâdhi and the form of which is falsehood, constantly besets truth Truth is to be adored after the knowledge of falsehood A name is to be adored. The spirit, as the bridge of the whole universe, is to be adored. The different forms of devotion to knowledge (Brahma charya) are sacrifice, continued sacrificial abstinence (Satrâya*n*a), silence, fasting, and retirement into a forest There is a vessel in the heart The mind is to be enlarged and raised by contemplating it as the rays of the Sun. Indra and Virochana, father of Bali, once went to Prajâpati. They realized the spirit in a vessel of water Virochana thought that the material body was itself the spirit. Indra agitated by doubt frequented Prajâpati Brahmâ instructed Prajâpati, and Prajâpati instructed Manu, and Manu instructed mankind—in the spiritual wisdom which embraces the following points. What is dream?

पांढरें होत पांढऱ्याचें काळें होतें, अशा या अवस्था चपळ क्षणभंगुर आहेत, नामरूपांचा आधार म्हटला म्हणजे आप तें आकाश तें मुख्य कारण, तेंच ब्रह्म असी ही जी ब्रह्मविद्या ती ब्रह्मदेवानें प्रजापतीस सांगितली प्रजापतीनें मनूला सांगितली, आणि मनूपासून सर्व प्रजांस मिळाली इतका हा आठवा अध्याय हे विषय छांदोग्य उपनिषदामध्यें आहेत या विषयांच्या संबंधानें इतिहासदृष्ट्या थोडा विचार केला पाहिजे

छांदोग्य उपनिषदावरून सहज लक्षात येईल की उपनिषदांच्या वेळीं विचारपद्धति समूळ बदलली छांदोग्य उपनिषदामध्यें आठ अध्याय आहेत पहिल्या अध्यायामध्यें ॐकार म्हणजे प्रणव, आणि उद्गीथ म्हणजे काय अशा प्रत्यक्ष अनुभवाच्या विषयाचा विचार केला आहे दृष्टि व्यापक व्हावी म्हणून सूर्याशीं या विषयाचा संबंध जोडून दिला आहे पुढें अध्यात्मविद्येचा उपक्रम केला आहे इतकें हे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या अध्यायांतील विषय चवथ्या आणि पांचव्या अध्यायामध्यें या विषयांचें समर्थन करावें म्हणून निरनिराळ्या दृष्टींनीं संवाद केले आहेत आणि दृष्टांत दिले आहेत सहाव्या अध्यायामध्यें याच गोष्टींचा विशद खोद केलो आहे सातव्या आणि आठव्या अध्यायामध्यें अध्यात्मविद्येची पराकाष्ठा करून जीवात्मा आणि परमात्मा एक असा सिद्धांत केला आहे प्रत्यक्ष अनुभवनाच्या विषयाच्या धोरणानें ब्रह्मविचार करायाचा

What is the condition of the spirit in a dream? What is the condition of the spirit in a sound sleep? The human body is liable to decay, but the spirit is eternal. The condition of colour and of form—yes the white becoming black and the black becoming white—are merely transient. Æther is the substratum of all names and forms It is the chief cause it is Brahma All this is spiritual wisdom This is the Eighth Adhyâya and the conclusion of the Chhandogya Upanisad

The different subjects explained in the Chhândogya-Upanisad are now to be examined from an historical point of view The Chhândogya Upanisad itself will show that the mode and form of thought of the Vedic Âryas had considerably changed The Chhândogya Upanisad consists of eight Adhyayas In the first Adhyâya the nature of *Omkâra* and *Udgîtha* are examined by a reference to actual experience. These subjects are connected with the Sun that the mental vision may be enlarged Then the explanation of spiritual wisdom is entered upon This is the relationship between the topics treated in the *first second and third Adhyâyas* These topics are discussed and illustrated in the fourth and the fifth Adhyâyas In the sixth Adhyâya a fuller explanation of the same subject is offered In the seventh and the eighth Adhyâyas the last limit of spiritual wisdom is reached The identity of the human spirit and the Supreme Spirit is pointed out The essential feature of the method of investigating Brahma at this period is characterized by a

हे ह्या विचारपद्धतीचे स्वरूप. ब्रह्मांडामध्ये सत्यवस्तु एकच आहे या सिद्धांतावर सारी ब्रह्मविद्या रचली आहे. जरी विचारपद्धति भिन्न आहे तरी ज्या विषयाचा लोकांस फार अभ्यास झाला होता, त्या विषयाचा त्याग करावा, आणि त्या विषयाच्या संबधाने जी बोलण्याची तऱ्हा लोकांत बसली होती ती समूळ मोडून टाकावी असें आर्यास योग्य वाटले नाही. म्हणून आचार्य जुने विषयच घेत, आणि त्याविषयीं जी लोकाची बोलण्याची तऱ्हा ती तशीच्या तशीच कायम ठेवीत पण त्याविषयाचा कटाक्ष मात्र फिरवीत, आणि त्यात सारें ब्रह्मनिरूपण आहे असें दाखवीत. मग सहजच अग्निहोत्र करावे हे योग्य आहे पण ते प्रत्यक्ष जे अग्निहोत्र करायाचे तें नव्हे. तर आध्यात्मिक अग्निहोत्र करावे. तसाच आकाश, भूमा, अक्षर, प्रणव, त्रिमात्र, प्रणव, दहर, आत्मा, अंगुष्ठमात्र, परंज्योतिः, इत्यादि शब्दाचा अर्थ वास्तविक न घेता ब्रह्मपर लावला आहे. हे या विचार पद्धति-सबधाने लक्षात ठेवण्याजोगे आहे.

ज्या वेळी ही उपनिषदे लिहिली गेली, त्या वेळी लोकामध्यें मोठे मन्वतर होत होते घर सोडून अरण्यात जावे, तेथेच बसावे, आणि ब्रह्मविचार करावा, हेच काय ते आपले कर्तव्य, हाच काय तो आपला धर्म असे आर्यास वाटू लागले. त्याचे नाव त्यानी अरण्यायन असे ठेविले. पूर्वीं ब्रह्मवाद्याच्या वेळी वेद शिकत बसणे यासच ते ब्रह्मचर्य असे

reference to fact and experience All spiritual wisdom is based upon the proposition that there is only one real substance in the universe Though the method of investigation was changed, yet the Âryan thinkers adhered to the style of expression established among the people, and to the thoughts which the people cherished most. Hence the Âchâryas took up the topics to which the Âryas were accustomed, and attempted to explain them from their own point of view proving that all the literature accumulated before them pointed to the Supreme Spirit, Brahma. They asserted that it was quite right to perform the Agnihotra-sacrifice But they insisted upon the established form of the Agnihotra as unworthy, and spiritualized it away In like manner, they persistently set aside the real significations of the following words,—æther, immensity, syllable, Om, trisyllable Om, Dahara, Spirit, As-big-as-a-thumb, Highest-flame and others. And they interpreted them into Brahma This particular feature of the method of the Âryas of the Upanisad-period deserves attention

Âryan society passed through a revolution at the time when the Upanisads were either pronounced or composed They thought that all that they ought to do was to abandon their homes, to retire into a forest, and to pass time there in contemplating the Supreme Spirit This they named Araṇyâyana At the time of the Brahmavâdins who

म्हणत. आता त्या अरण्यायनास ब्रह्मचर्य म्हणू लागले. हे ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्मविद्या संपादन करण्याची ही नवी विद्या प्रथम क्षत्रियांस प्राप्त झाली आणि त्यांपासून ब्राह्मणांस मिळाली, असे छांदोग्यांत स्पष्ट सांगितलें आहे. दृढ संकल्प करून ध्यान करावें आणि त्याच्या योगानें ज्यास पितर भेटण्याची इच्छा असेल त्याच्यापुढें येऊन पितर उभे राहात. ज्यास गंधमाल्य प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल त्याच्या संकल्पाच्या जोरानें गंधमाल्य पुढें येऊन पडत असे. अशा प्रकारची त्या वेळच्या लोकांची पद्धति होती. अशा रीतीनें त्या वेळचे लोक योगाभ्यास करीत.

याच पद्धतीस धरून अलीकडे बंगाल्यामध्यें काहीं ब्राह्मसंप्रदायी लोकांनी आध्यात्मिक यात्रा करण्याचा प्रचार पाडला आहे. या प्रकाराविषयीं आम्हांस काहींएक म्हणणें नाहीं. परंतु हा प्रकार आम्हांस नवीन आहे असें मात्र त्यांनी समजूं नये इतकीच आमची विनंति आहे. अशा रीतीनें योगसंप्रदायाचा उपक्रम झाला आणि आर्य लोक अरण्यायन करतां करतां वानप्रस्थ बनूं लागले. पण एकदां त्यांना त्या ध्यानाचा आणि योगाचा संरंभ त्यास आटोपता येईना. म्हणून हळू हळू ते सर्व परित्याग करून परिव्राजक होऊं लागले आणि यामधूनच संन्यास घेण्याची पद्धति उत्पन्न झाली. हे वानप्रस्थ आणि हा संन्यास ही दोन्ही बौद्धांस अति इष्ट. उपनिषद् आचार्या-

preceded these Âchâryas the Âryas devoted all their time to the study of the Veda. This they named Brahma-charya. Now they gave the name of Brahma charya to Aranyâyana also. This new form of Brahma charya a chieved spiritual wisdom which the Kshatriyas acquired first and from them the Brâhmanas. This statement is distinctly made in the Chhândogya Upanisad. By means of firm resolution followed by contemplation the Âryas could see standing before them face to face their dead ancestors if they desired this. If they de sired fragrance and flowers by means of their firm resolution or firm will they saw fragrant flowers fall before them. This was the mode of thought at this time—a mode according to which Yoga was then practised. Some Brahmos of Bengal have pro bably borrowed this idea of hold ing communion with dead per sons and of performing spiritual pilgrimages. In this connection we have to observe that this side of spiritualism was known to our ancestors centuries ago. Thus the doctrine of Yoga gradually developed and the Âryas while practising Aranyâyana began to live a forest life (Vânaprastha). But they could not control the emotional force which contempla tion (Yoga) engendered. Gradually they abandoned the world and its pleasures and became ascetics and developed the practice of asceticism called Sanyâsa. Forest-life and Sanyâsa were specially cherished by the Buddhists. Till the Upanisads were composed and pronounced, the Âchâryas

नी केली. तोपर्यंत यज्ञसंप्रदाय, धर्मसंप्रदाय, कथा, इतिहास, पुराणें, जी ऋषींमध्ये आणि ब्रह्मवाद्यांमध्ये चालत होती तीच ह्या आचार्यास मान्य होती. बौद्धास हळू हळू ती मान्य होईनातशी झाली. त्यानी आपलीच कथापुराणें हळू हळू पुढे केली. इतकेच कीं या उपनिषदाच्या वेळच्या आचार्यास जे वेद आणि यज्ञ मान्य होते, त्याचा बौद्धानी समूळ त्याग केला. ह्या दृष्टीनें पाहिले असता जैमिनीच्या पूर्वमीमासासिद्धातामध्ये आणि बादरायणाच्या उत्तरमीमासासिद्धातामध्ये मोठा भेद पडतो तो असा. आपल्या कामना सिद्ध व्हाव्या म्हणून इंद्रादि देवाचे आव्हान आर्यलोक करीत. परतु इंद्रादि देव कोणाची उपासना करीत नाहीत असें ते मानीत. बादरायणानें इंद्रादि देवासहि ब्रह्माची उपासना लावून दिली आहे. या सबधानें या तिसऱ्या पादामध्ये मोठी खटपट केली आहे. तसेंच या छादोग्य उपनिषदामध्ये ज्या कथा आहेत त्यावरून असे सिद्ध होतें की शूद्रादिकास उपनयन न करता किंवा उपनयन करून ब्रह्मविद्या क्षत्रिय लोक शिकवीत. अशा ज्या ह्या कथा त्या कथाची व्यवस्था कशी करावी अशी अडचण बादरायणास पडली नसेल असे आम्हास वाटते. कारण अशा रीतीनें व्यधिकरण करून शूद्राच्या अधिकाराची व्यवस्था करण्याची आवश्यकता नाही. आणि छादोग्य उपनिषदात ज्या कथा आहेत त्याची अशा रीतीनें व्यवस्था

recognized the sacrificial system, the religious system, the traditions, the folklore, which the *R*isis and the Brahmavâdins had developed The Buddhists gradually condemned them and substituted in their place their own traditions and folklore to such an extent that they threw the sacrificial system and the Veda over-board.

From this point of view there is a great distinction between the Pûrva-Mîmânsâ-doctrines of Jaimini and the Uttaramîmânsâ doctrines of Bâdarâya*n*a The ancient Âryas invoked their gods like Indra and worshipped them that their desires might be fulfilled But they believed that the God Indra himself was inferior to no other god Bâdarâya*n*a distinctly states that gods like Indra worship the Supreme Spirit The third Chapter, of which this is the summary, reproduces all the points of this controversy. Stories in the Chhândogya-Upanisad show that the Shûdras were invested with the sacred thread and instructed in spiritual wisdom by Ksatriya-teachers These stories appear not to have perplexed the mind of Bâdarâya*n*a, because there is no necessity of adjusting their scope and application by making a digression and raising a controversy, nor can the stories be easily explained away. We believe that the sûtras, in which an attempt to explain away these stories is made, are inter-pollated If the stories are not taken as they are, they lose their interest and appear disconnected The practices of Yoga-philosophy, which

होतहि नाहीं. उपक्रमोपसंहारादि ज्या ग्रंथांच्या धोरणानें व्यवस्था करतात ती पूर्ण स्पष्ट आहेत. नाहींतर त्या ग्रंथांचा रसभंग होतो, उपक्रम आणि उपसंहार यांचा हानि होते, आणि पुढें या योगाचा प्रकार पाहूं लागल्यास पाहिला आहे त्या प्रमाणेंच आणि या छांदोग्य उपनिषदाशीं एकवाक्यता होत नाहीं. निरनिराळ्या उपनिषदांमध्यें या अध्यात्म विद्येचें कसें निरूपण केलें आहे हें पुढें उपसंहारावरून दाखवूं. इंद्र म्हणजे आर्य लोकांचा पुढारी त्यास संशय पडला विरोचन अनात्मवाद्यांचा पुढारी त्याचा निश्चय झाला असें जी कथा वर्णिली आहे ती लक्षांत ठेवली पाहिजे आहे.

are gradually developed fail to harmonize with the teachings of the Chhandogya Upanishad. How spiritual wisdom is explained in the different Upanishads will be in like manner shown to the reader as we proceed. It is to be remembered that Indra the representative of the Âryas doubts and that Virochana is convinced of materialism as the story already narrated shows.

अथ प्रथमाऽध्यायस्य चतुर्थः पादः ॥

आनुमानिकमप्येकेषामिति चेन्न शरीररूपकविन्यस्तगृहीतेर्दर्शयति च ॥ १ ॥

भावार्थः । एकेषामाचार्याणां मते उपनिषत्सु यन् निर्दिष्टं तत् सांख्यप्रसिद्धाऽव्यक्तप्रकृतिपरमित्यनुभवात् सिध्यतीति चेन् न । तत् तु शरीरधारीत्युपन्यासः । तेन तद् आत्मपरमिति बादरायणो दर्शयति ॥ अत्र शंकरः । न परकल्पितं प्रधानं प्रतीयते + + + । कुतः । प्रकरणात् परिशेषाच्च + + + । एतस्मिंस्तु पक्षे परमात्मविषयेणैव परेण पुरुषग्रहणेन रथिना आत्मनो ग्रहणं द्रष्टव्यं । परमार्थतस्तु । परमात्मविज्ञानात्मनोर्भेदाऽभावात् । + + + तदेवं पूर्वाऽपरलोचनायां नाऽस्त्यत्र परपरिकल्पितस्य प्रधानस्याऽवकाश इति ॥ अत्र मध्वः । तस्यैव पारतंत्र्याच्छरीररूपकेऽव्यक्ते विन्यस्तस्य परमात्मन एवाऽव्यक्तशब्देन गृहीत इति ॥ रामानुजस्तु । आत्मैव महानिति विशेष्यते । तस्मादपि रथरूपितं शरीरं परं तदायत्तत्वाज् जीवात्मनः सकलपुरुषार्थसाधनप्रवृत्तीनां । तस्मादपि परः सर्वांतरात्मभूतोऽतर्यामध्वनः पारभूतः परमपुरुष इति ॥ अत्र वल्लभः बुद्धेरात्मा विज्ञानं तद् ब्रह्मविषयकं महद् भवति । ततः परमव्यक्तं न प्रकटं । भगवत्कृपैव सा तु भगवदधीना न साधनांतराधीना । स च भगवान् स्वाधीन इति ॥ अनुसंधास्यमानान्युपनिषद्वाक्यान्यध्यात्मप्रक्रियां दर्शयंति ॥

अनुसधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

इंद्रियेभ्यः परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः । मनसश्च परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान् परः । महतः परमव्यक्तमव्यक्तात् पुरुषः परः । पुरुषान् न

पर किंचित् सा काष्ठा सा परा गति । क० उ० (३ ११) ॥ आत्मानं रथिन विद्धि शरीरं रथमेव तु । बुद्धिं तु सारथिं विद्धि मन प्रग्रहमेव च । इंद्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् । आत्मेंद्रिय मनोयुक्त भोक्तेत्याहुर्मनीषिण । क० उ० (३ ४) ॥ मनो महान् मतिर्ब्रह्मा पूर्बुद्धि ख्यातिरीश्वर । प्रज्ञा संविच्चितिश्चैव स्मृतिश्च परिपठ्यते । (स्मृति) ॥ यो ब्रह्माण विदधाति पूर्वं यो वै वेदाश्च प्रहिणोति तस्मै । श्वे० उ० (६ १८) ॥ एष सर्वेषु भूतेषु गूढात्मा न प्रकाशते । दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभि । यच्छेद् वाङ्मनसी प्राज्ञस्तद् यच्छेज् ज्ञान आत्मनि । ज्ञानमात्मनि महति नियच्छेत् तद् यच्छेच्छान्त आत्मनि । क० उ० (३ १३) ॥ तुच्छ्येनाभ्वपिहितं यदासीत् । ऋ० सं० (१० १२९ ३) ॥ अव्यक्तमचल शान्त निष्कल निष्क्रिय पर । यो वेद हरिमात्मान स भयादनुमुच्यते । (पिप्पलादशाखायां) ॥ अधिष्ठान तथा कर्ता करण च पृथग्विध । विविधाश्च पृथक् चेष्टा दैव चैवात्र पंचमं । भ० गी० (१८ १४) ॥ सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्त स्मृतिर्ज्ञानमपोहन च । भ० गी० (१५ १५) ॥ ईश्वर सर्वभूताना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन् सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया । तमेव शरण गच्छ सर्वभावेन भारत । भ० गी० (१८ ६२) ॥

पहिल्या अध्यायाचा चवथा पाद.



१. कित्येकांच्या मतें अनुमानावरून असें सिद्ध होतें (कीं तें अव्यक्त प्रकृति), असें ह्मटलें तर तसें नव्हे. शरीराच्या रूपकाचा उपन्यास केला आहे; त्यावरून तें ह्मणजे आत्मा.

१ उपनिषदामध्ये "महान् याच्या पलीकडे अव्यक्त" असे वाक्य आहे या वाक्याचे प्रकरण पुढे जी उपनिषद्वाक्ये एकदम येतील त्यावरून कळेल त्या उपनिषद्वाक्यातील अव्यक्त पदाचा अर्थ काय, हा विचार या सूत्रात करावाचा कोणी आचार्य असे म्हणतात की 'अव्यक्त' म्हणजे सांख्यमतातील अव्यक्त प्रकृति. सांख्य मतात दोन प्रकारची प्रकृति मानली आहे एक व्यक्त, दुसरी अव्यक्त. पञ्चभूतात्मक जे जगत् ती व्यक्तप्रकृति या व्यक्तप्रकृतीचा आधार आणि उत्पत्तिस्थान अव्यक्तप्रकृति. ती सत्वगुण, रजोगुण, आणि तमोगुण याची साम्यावस्था. ही अव्यक्तप्रकृति अव्यक्त पदाने उपनिषदात वर्णिली आहे; असे कित्येक आचार्य मानतात. हे बादरायणास मान्य नाही.

THE FOURTH CHAPTER OF THE FIRST ADHYÂYA.



1. If it be said that according to some, inference proves (that the term *Avyakta* signifies Sânkhya-Prakriti), then no It shows (that it signifies spirit) because it is explained by the illustration of a body.

1 The Upanisad-text—Great (mahân) and beyond it is *Avyakta*—occurs The context of this text will be seen from the Upanisad-texts given at the end of this note The question is—how is this text to be interpreted? Some Âchâryas state that the term *Avyakta* in the text signifies the semi-material noumenon (Prakriti) propounded in the Sânkhya-system, according to which this noumenon is seen in two forms—as expressed and as latent) This phenomenal world is the noumenon expressed The noumenon itself is its basis and origin The noumenon consists of the qualities of darkness, of light, and of truth, in a state of equilibrium This is the Avyakta-Prakriti, and this is referred to by the term *Avyakta* used in the Upanisad-text This statement of some Âchâryas is rejected by Bâdarâyana He states that the

ते असें म्हणतात कीं अव्यक्त म्हणजे शरीररूपानें झालेला पदार्थ. मूळ शांकर सूत्रांत 'शरीररूपक विन्यस्त-गृहीतेः' असें पद आहे. त्याचा अर्थ शरीराचें रूपक करून दाखविलें गेलें आहे. यावर शंकराचार्य असें म्हणतात कीं अव्यक्त म्हणजे सांख्यमतांतील प्रधान असा अर्थ करतां येणार नाहीं. या उपनिषद्वाक्याचें प्रकरण पाहिलें पाहिजे आणि त्याच ठिकाणीं जें आहे या पुढें मागें असलेलें जें वर्णन केलें आहे तें पाहिलें पाहिजे आणि या दोहोंच्या मागानें अव्यक्त शब्दाचा अर्थ बसविला पाहिजे. कठवल्लीमध्यें सांगितलें आहे कीं अव्यक्ताच्या पलीकडे पुरुष. हा पुरुष हाच परमात्मा. पुन्हा कठवल्लीमध्यें असें वर्णन आहे कीं शरीर हा रथ. जीव हा त्यामध्यें बसणारा रथी. म्हणून जीवात्मा आणि परमात्मा या दोहींचें वर्णन आलें आहे. सकृद्दर्शनीं असें वाटतें कीं हे दोघेहि भिन्न आहेत. तथापि वास्तविक या दोहोंमध्यें भेद नाहीं. मागील पुढील उपनिषद्वाक्यांचा विचार केला असतां आणि दुसरीं उपनिषद्वाक्यें पाहिलीं असतां सांख्यमतांतील अव्यक्त प्रकृति म्हणजे प्रधान म्हणजे जी जड वस्तु आहे तिचें निरूपण उपनिषद्वाक्यांत नाहीं असें सिद्ध होतें. यावर मध्वाचार्य असें म्हणतात कीं जीवात्मा पारतंत्र्य आहे. त्या जीवाविषयीं शरीराचें रूपक करून तो ज्ञात अव्यक्त असें म्हटलें आहे, कारण तो परमात्म्याच्या आधीन आहे. मुख्य व्यक्त तो प

term *Avyakta* signifies the spirit and is illustrated by comparing it to a human being. This is the sense of the sûtra. The term *Sharîra rûpaka vinyasta grihîteh* is used in the sûtra. It signifies—an explanation by means of an exposition of an illustration of the human body. Upon this Shankarâchârya observes :—the term *Avyakta* is not to be interpreted into the Prakriti of the Sankhyas. The context of the Upanisad is to be examined and the statements made in the different parts of the Upanisads are also to be examined and by means of the e the interpretation of the term *Avyakta* is to be adjusted. The Kathavalli Upanisad states that beyond the Avyakta is Person, and this Person himself is the Supreme Spirit. The Katha valli Upanisad again states that the human body is a car and that the human spirit drives in it. Thus the human spirit and the Supreme Spirit are both mentioned. At first sight it appears that they are both distinct. But really speaking there is no distinction between them. The examination of the Upanisad texts, preceding and following the Upanisad texts in which the term *Avyakta* is used and the examination of the Upanisad texts in general prove that the semi material noumenon known in the Sankhya philosophy as Prakriti is not mentioned in the Upanisad texts at all. Upon this Madhvâchârya observes :—the human spirit is dependent. It is compared to a human body. It is known. It is Vyakta and the Supreme Spirit upon whom the hu

आत्माच अव्यक्त तो जीवाचा आधार. म्हणून परंपरेने जीवासहि अव्यक्त असें म्हटले आहे यावर रामानुज म्हणतातः– उपनिषदातील ‘ महान् ’ शब्दाचा अर्थ जीवात्मा. जीवात्म्याच्याहि पलीकडे हें शरीर. याचे नाव अव्यक्त असे उपनिषदात आहे. कारण शरीर हे सर्व पुरुषार्थांचे साधन आहे. आणि अव्यक्ताच्याहि पलीकडे पुरुष म्हणजे परमात्मा. तो सर्वांचा अंतरात्मा आहे आणि तोच संसाररूप मार्गाच्या पार असलेला परमात्मा. यावर वल्लभ असे म्हणतात की उपनिषद्वाक्यातील ‘ बुद्धिपलीकडे आत्मा ’ म्हणजे विज्ञान; तेच ब्रह्मज्ञान झाले म्हणजे त्याचें नाव महान्; आणि अव्यक्त म्हणजे भगवानाची कृपा. ही कृपा भगवानाच्या स्वाधीन आहे. आणि दुसऱ्या कोणाच्या स्वाधीन नाही. यासबधी जी उपनिषद्वाक्यें आली आहेत त्याचे भाषातर एणेप्रमाणे. “ इंद्रियाच्या पलीकडे सूक्ष्म तत्त्वे, सूक्ष्म तत्त्वाच्या पलीकडे मन, मनाच्या पलीकडे बुद्धि, बुद्धीच्या पलीकडे महान् आत्मा. या महान्-आत्म्याच्या पलीकडे अव्यक्त, अव्यक्ताच्या पलीकडे पुरुष, आणि त्या पुरुषाच्या पलीकडे काहीएक नाही. हीच सीमा. एथेच धाव खुटली.” “ आत्मा रथात बसणारा असे जाण. शरीर हे रथच बुद्धि ही सारथी. असे जाण मन ही आननी इद्रिये ही घोडी. त्या घोड्याना विषय हे मार्ग पडितजन शरीर,इद्रियें, आणि मन इतक्याला मिळून भोक्ता असें म्हणतात. ” ‘ मन

man spirit depends, and who is its support, is mentioned as Avyakta, and, therefore, the human spirit also in this connection is referred to as Avyakta Upon this Râmânuja observes - the term *Mahân*, used in the Upanisad-text under examination, signifies the human spirit Beyond it is the human body, which is referred to as Avyakta in the Upanisad-text, because the human body is the means of accomplishing the purpose of human life And beyond this Avyakta or the human body is the Person or the Supreme Spirit Upon this Vallabha observes -an Upanisad-text is—the spirit is beyond the intellect By the spirit pre-eminent knowledge is meant, and when this pre eminent knowledge ripens into the knowledge of Brahma, it is named Mahân, and the term Avyakta expresses the grace of God, because he alone and none else can show it The following is the translation of the Upanisad-texts quoted “Beyond the senses are the subtle elements; and beyond the subtle elements, is the mind, and beyond the mind is the intellect, and beyond the intellect is the great—the spirit, beyond the great the spirit is the Avyakta, beyond the Avyakta is the Person, and beyond the Person there is nothing. This is the *ne plus ultra*. This is the last place” “Know that the spirit sits in a car The car is the human body itself. Know that the intellect is a coachman. The mind is the reins The senses are the horses The objects are the (so many) paths The wise men believe that the human body, the senses, and

म्हणजे मननशक्ति मति म्हणजे मानि निश्चय ब्रह्म म्हणजे आत्मा ज्याच्या आश्रयानें तो आधारस्थान बुद्धि म्हणजे तात्कालिक निश्चय ख्याति म्हणजे कीर्ति शक्ति ईश्वर म्हणजे नियमनशक्ति प्रज्ञा म्हणजे वैकालिक निश्चय संवित् म्हणजे प्रकाश करणारी शक्ति, चिति म्हणजे आरोपित ज्ञान आणि स्मृति म्हणजे गतवृत्तांताचें ज्ञान या सर्वांना महान् म्हणजे समष्टि बुद्धि असें नाव आहे' "जो ब्रह्मदेवाला प्रथम उत्पन्न करतो (आणि) अर त्याला जो वेद देतो (तो परमात्मा)' "सर्व भूतांमध्यें गुप्त आत्मा असून तो दिसत नाहीं जे सूक्ष्मदर्शी सूक्ष्म आणि एकाग्रबुद्धि करतात त्यांना दिसतो + + + सर्व इंद्रियें मनाच्याठायीं ज्ञात्यानें घालावीं ते (मन) ज्ञानात्मक बुद्धीमध्यें घालावें तें ज्ञान महत्तत्वरूप बुद्धीमध्यें घालावें तें महत्तत्व शांत आत्म्यामध्यें घालावें" 'तुच्छ जें तम त्यानें (हें) जगत् जेव्हां आच्छादिलेलें होतें' अव्यक्त अचल शांत जो कर्मीजामी होत नाहीं जो निष्क्रिय, जो मोठा असें ज्याला ज्ञान होई आत्मा असें होतें तो भयापासून सुटतो'

शरीर जड स्वभाव अहंकार निरनिराळीं इंद्रियें निरनिराळ्या क्रिया, सर्व प्रेरक अंतर्यामी, (ही कर्माची पांच कारणें)'' सर्वांच्या हृदयाच्याठायीं मी असतों आहें मजपासून स्मृति ज्ञान हीं होतात आणि हीं नाहीशींहि होतात'

सर्व भूतांच्या हृदय देशामध्यें ईश्वर, हे अर्जुन, वास करतो आपल्या मायेच्या

the mind, constitute an agent.' 'Mana—power of thought, mati—reflection Brahma—spirit the 1 th—the substratum of all that is enjoyed or suffered in life the Buddhi—intellect, Khyâti—the power of speech Ishvara—the power of control Prajna—pre eminent knowledge Samvid—the power of perception, Chiti—the power of ignorance and Smriti—memory all these together are called Mahan or the knowledge of totality (samashti)" Well, He is the (Supreme Spirit) who first creates the God Brahma and then grants him the Vedas Being concealed in all the phenomena the spirit is not seen. Those who can see the subtle who can concentrate and focus their mind see Him × × A wise man should direct all the the senses into the mind, and he should direct that into the conscious spirit and should direct that into the great spirit and should direct that into the tranquil spirit When this world was covered over with contemptible darkness He is delivered from fear who knows Him the spirit high, above all change tranquil permanent, and concealed (The five means of activity are)—the all moving inner spirit the different acts, the different senses consciousness and the body I *sit in* the hearts of all From me the

...ing all things mounted upon the machines of their bodies by His power of delusion Seek a refuge in him alone with all thy heart, oh Bharata

सूत्राणि.

सूक्ष्मं तु तदर्हत्वात् ॥ २ ॥

